म. ग्रं. सं. ठाणें
विषय इति
सं. नं.

२०२
इति.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
संग्रहालय क्रमांक २०२
लेखक अनंत जा. आगनत
सन १७९९
पुस्तकाचें नांव वगरीची कत्तल

सन १७९९ :

सं. ६३६८

लेखक - [illegible]

प्र. काल सन १९०८ :

(दोतेरची पानं १८८ पाहा)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
दि. २६/६/८४
क्र. 55/...
ग्रं. क्र. ९३१६६८०

अपु • 2.02

# काशीची कत्तल!

सन १७९९.

यूरोपांतील निरनिराळी वणिज मंडळी ज्या दिवशीं आपल्या वाणिज्य तंच्या साधनांसहित नौकायनांतून हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर प्रथम उतलीं, तो दिवस हिंदुस्थानवासियांस सुदिन किंवा दुर्दिन होय, या वादग्रस्त प्रश्नाचा समाधानकारक उलगडा करणें हें रेशमाच्या रज्जूंना दृढ बसलेल्या ग्रंथि उकलण्या इतकेंच कठिण आहे. रेशमांच्या धाग्यांची झालेली गुंतागुंत जशी उकलली तरच उकलते, तशीच या वादग्रस्त प्रश्नाची गोष्ट आहे. या साहसी लोकांनीं येथें येऊन व कोठेंतरी जेथें जागा मिळेल तेथें जुनें घ्यावें आणि नवें घ्यावें, याप्रमाणें देवघेवीचा व्यापार प्रथम सुरू केला. प्रथम खरीं व्यापाराचीं मुख्य साधनें जीं तागडी तराजू यांचाच त्यांनीं उपयोग केला. त्यांच्याच सहाय्यानें इकडचें तिकडे आणि तिकडचें इकडे अशी प्रथम किरकोळ जिन्नसांची, व मग मालाची अशी अदलाबदल होऊं लागली. मरुद्देशांतून द्रव्यार्जनाच्या इच्छेनें नुसती लोटा आणि दोरी पाठीशीं बांधून आलेला मारवाडी एखाद्या खेडयांत, किंवा गांवांत, किंवा शहरांत गेला ह्मणजे प्रथम एखाद्या पडक्यासडक्या घराच्या कोनाकोंपऱ्यांत किंवा जेथें कोठें जागा मिळेल तेथें जागा मागून घेऊन आपलीं दोन चार टोपलीं मांडून आपलें लहानसें दुकान थाटतो. मग हलके हलके त्याला जसजसें गिऱ्हाईक मिळूं लागून त्याचा व्यापार वाढत जातो, तसतसा त्याला गिऱ्हाईकांना लागणाऱ्या मालाचा जास्त जास्त पुरवठा करणें भाग पडून त्याला ती पहिली कोंपऱ्यांतील जागा

मग पुरेनाशी होते. तो मग तीच जागा जर त्याच्या सोयीची असली आणि ती सोडूं नये असें त्याच्या मनांत असलें तर मग ओसरी, मग अर्धे घर, मग सगळें घर असें आपल्या ताब्यांत घेतो, आणि नंतर कालांतरानें ज्या घरांत तो प्रथम भाडेकरी ह्मणून येऊन राहिला असतो, त्याच जागेवर मग वहिवाटीचा हक्क सांगतो व शेवटीं त्या घराचा आपण मालक होऊन बसतो. आतां ज्या घराचा तो कालांतरानें मालक होऊन बसतो. त्या घराच्या मालकाला त्या घराबद्दल त्याच्याकडून कांहींच मोबदला मिळत नाहीं. असें ह्मणणें हें न्याय्य होणार नाहीं इतकेंच नव्हे तर तसें ह्मणणें ह्मणजे एक प्रकारचें धार्ष्ट्यही होईल. त्याला त्याचा कांहीं तरी मोबदला हा मिळालेला असतोच. तो मोबदला 'आपल्याला किती मिळाला, आपण त्याला काय दिलें, मिळाला तो योग्य मिळाला किंवा नाहीं,' हें पाहणें गिऱ्हाइकाचें काम आहे. दुकानदाराचें नाहीं. कारण जो दुकान मांडून आणि हातांत कांटा धरून बसलेला असतो, तो कांहीं गिऱ्हाईकाला बरोबर योग्य मोबदला देण्याकरितां समतोल पारड्यांचा कांटा घेऊन बसलेला नसतो. त्या पारड्यांची विषमस्थिति ही कोठेंही असावयाचीच; आणि वणिज वृत्तिच्या मनुष्याचें जीवन त्या विषमस्थितिच्या पारड्यांतच असतें. समतोल पारड्यांचा अगदीं धारवाडी कांटा घेऊन जर तो बसेल तर त्याचें चालावयाचेंही नाहीं व अगदीं थोडक्या अवकाशांत तो जो जागेचा भाडेकरी असतो तो मालकही व्हावयाचा नाहीं. आतां त्यानें वणिजवृत्ति पतकरली ह्मणजे सचोटीनें वागूच नये, असें नाहीं. 'पण त्यानें सचोटीनें कां वागूं नये, आह्मी त्याच्यावर फाजील विश्वास ठेवला हा आमचा मूर्खपणा आहे,' असें मग गिऱ्हाईकानें त्यानें दिलेल्या किंमतीचा अर्धाच मोबदला आपल्या पदरांत घेतल्यावर शुद्धीवर येऊन, त्यानें आह्मांला मोबदला तोलून देतांना दांडीला झोल देऊन फसविलें, अशी मग त्याच्याशी रस्त्यांत कज्जेकफावती करीत बसून आपल्या मूर्खपणाचा बाजार भरविण्यापेक्षां प्रथमपासून सावध असणें आणि दिलेल्या किंमतीचा योग्य मोबदला आपल्या पदरांत पडतो किंवा नाहीं, हें सावधपणानें पाहणें गिऱ्हाइकाचें खरें कर्तव्य आहे. तें करण्यांत तो चुकला. कीं दुकानदारानें त्याला चकविलेंच.

दुकानदारही गिऱ्हाइकाकडून किंमत घेऊन जेव्हां तिच्याबद्दल द्यावयाचा मोबदला आपल्या तराजूंत तोलीत असतो, तेव्हां तो कांहीं नुसती मोबदला देणारी वस्तू तेवढी तोलीत नसतो, तर तिच्याबरोबर आपलें आणि गिऱ्हाई-कांचें असें दोघांचेंही शहाणपण आणि मूर्खपणा हीं तोलीत असतो. त्याचें मात्र त्यानें गिऱ्हाइकाकडून किंमत घेऊन त्याच्या पदरांत मोबदला टाकलेल्या जि-न्नसाच्या मापापेक्षां त्याच्याजवळ खरें माप असतें. त्याच्यावरून गिऱ्हाइकानें व आपण घालविलें किती आणि मिळविलें किती, हें तो ताबडतोब ताडतो. यांतच त्याचा खरा नफा असतो, तो मालांत नसतो. अशीं गिऱ्हाइकें जितकीं त्याला जास्त मिळत जातात तितका त्याचा व्यापाराचा पसारा वाढंत जाऊन त्याची भरभराटही भराभर होत जाते. तो प्रथम जो मीठ पीठ, तोलून दे-ण्याचा व्यापार करतो, तो सोडून मग मोठ्या धान्याचा, पुढें कापडाचा, व पुढें चांदी सोनें तोलण्याचा व्यापार करूं लागतो. दैववशांत असें होतें कीं ज्या तराजूनें तो वाणी प्रथम मीठ पीठ तोलीत असतो, त्याच तराजूनें मग चांदी, सोनें तोलून गिऱ्हाइकाच्या पदरांत टाकतो. त्यांत त्याची चलती झाली म्हणजे मग त्या गांवांतील किंवा शहरांतील लहान लहान सावकारांचे धनकोश तोलून शेवटीं नगरशेट बनतो आणि मग एखाद्या राजाचा खजिना तोलण्याचा हक्क संपादन करून त्या राजाचा पोतदार बनतो. तीच त्याची पोतदारी वाढत गेली म्हणजे मग त्याच तराजूनें राजाचीं राज्येंही तोलून टाकतो. त्यांत जड कोणतें आणि हलकें कोणतें हें त्याला तेव्हांच समजतें. त्याच्याबद्दल प्रथम लोक शंका कुशंका काढीत बसतात. पण एकदां त्याची छाप बसली, वजन आणि इभ्रत वाढली म्हणजे मग त्याच्या चलाखीचें. लुच्चेगिरीचेंही वजन वाढतें. त्यामुळें मोठ्या दुकानीं फसलेला गिऱ्हाईकच शेवटीं जगाच्या दृष्टीनें मूर्ख ठरतो. मात्र तो मोठ्या दुकानीं फसतच नाहीं, किंवा त्याला मोठा दुकानदार फस-वित नाहीं, असें नाहीं. तो फसतो व त्याला फसवितात. मात्र त्या कृत्याची जबाबदारी मुनिमांवर टाकून मोठे शेट शेवटीं कानांवर हात ठेवून मोकळे ते मोकळे. ही वणिजवृत्ति करणारा एकटा मारवाडीच असतो असें नाहीं. तर गुजर. बोहरी. पारशी. ब्राम्हण. वैश्य वगैरे सर्व जातींच्या मंडळींची या

धंद्यांत चढाओढ चाललेली असते. या मंडळींपैकीं ज्यांचा हा धंदा अनुवंशिक ह्मणजे पिढ्यानपिढ्या चालंत आलेला असतो, तीच मंडळी जितकी पुढें लवकर सरसावते व एखाद्या बिकट प्रसंगीं टिकाव धरते, तितका ज्यांचा हा अनुवंशिक धंदा नसून ती या धंद्यांत पडलेली असतात, त्यांच्यानें तशा प्रसंगीं नेट व टिकाव धरवत नाहीं. त्यामुळें अशा प्रसंगीं ती मंडळी मागें पडून अनुवंशिक धंद्याची मंडळी पुढें सरतात. अशी जरी स्थिति असते तरी या अनुवंशिक वणिजवृत्ति असणाऱ्यां मारवाडी व गुजर मंडळींना त्यांच्या धंद्यांत प्रतिस्पर्धी नसतात, असें नाहीं. ते सर्व ठिकाणीं आहेतच. त्या आपल्या प्रतिस्पर्ध्यांना मागें टाकून जे कोणी पुढें सरसावतात, तेच नगरशेट व जगत् शेट बनतात आणि मोठ्या राजांचा धनकोश तोलण्याचें सामर्थ्य त्यांच्याच अंगीं येतें. अशा रीतीनें अगदीं हीन स्थितिपासून आपल्या कर्तबगारीनें, चलाखीनें, शहाणपणानें, जो कोणी किंवा जे कोणी उच्चपदाप्रत पोंहचून नगरशेट किंवा जगत् शेट बनतात, त्यांच्या कृत्यांची मिमांसा आपल्या मनाशीं वाटेल त्यानें वाटेल ती करावी. त्यांला कोणी अडथळा करीत नाहीं. नगरशेट किंवा जगत् शेट बनलेली एकच व्यक्ति असो किंवा पुष्कळ व्यक्तींचा समुच्चय ह्मणजे पेढी असो. दोघांचें सामर्थ्य लोकसमाजावर सारखेंच चालतें. हिंदुस्थानांत आलेल्या युरोपस्थ वणिजवृत्तीचें अवलंबन केलेल्या निरनिराळ्या जातींच्या लोकांची स्थिति प्रथम वर सांगितलेल्या लहानशा दुकानदारापासून नगरशेट किंवा जगत् शेट बनलेल्या मंडळीच्या स्थितिप्रमाणेंच होती. एखादा हुशार मनुष्य ज्याप्रमाणें त्याच्या कामांत प्रतिस्पर्धी असणाऱ्या सर्वांना मागें टाकून एकटाच किंवा त्याच्या मदतनीस मंडळीसह पुढें सरसावतो. त्याचप्रमाणें पोर्तुगीज, डच, फ्रेंच या सर्व लोकांना मागें टाकून इंग्लिश लोक हिंदुस्थानांतील व्यापारांत पुढें सरसावले. ते प्रथम हिंदुस्थानांत आले तेव्हां इतराप्रमाणेंच इकडील मालाची देवघेव पहिल्यानदां करीत होते. प्रथम ही त्यांची देवघेव किरकोळ जिन्नसांची होती. पुढें त्यांचा व्यापार वाढत चालला तशा मोठमोठ्या वखारी घालून पुष्कळ मालाची देवघेव सुरू झाली. पुढें आणखी त्यांची त्या धंद्यांत चलती झाल्यावर ते मालाचा व्यापार सोडून

सोन्यानाण्याचा व्यापार करूं लागले. त्यांत चांगली बरकत आल्यावर मग जमिनी, महाल, यांच्या अदलाबदलीचा लोकांशीं, आणि मग लहान लहान राजे रजवाडे यांच्याशीं त्यांचा व्यापार सुरू झाला. शेवटीं त्या सर्वांचें धन-कोश जगत् शेटाप्रमाणें तोलण्याचें त्यांच्या अंगीं पूर्ण सामर्थ्य आलें, तेव्हां ते राजे रजवाड्यांचे धनकोशच नुसते काय, पण त्यांचीं लहान मोठीं राज्येंही आपल्या तागडीतराजूंत घालून तोलूं लागले, व हलकें कोणचें आणि वजन-दार कोणचें हें ते आणि त्यांचेच मुनीम मग ठरवूं लागले. पेढीची भरभराट आणि इभ्रत वाढलेली असली ह्मणजे त्या पेढीवर दुर्दैव पाशांत अडकलेला एखादा मनुष्य त्यांतून आपली सुटका करून घेण्याकरितां आपल्या मालकीचा जिन्नस तिचें वजन आणि किंमत त्याला माहित असूनही ती पुनः करून घे-ण्याकरितां गेला ह्मणजे तो पेढीवाला त्याच्या तराजूंनें तिचें वजन करून व तिची किंमत ठरवून जी सांगेल ती ऐकून, तो जिन्नस पदरांत बांधून घेऊन जसा मुकाट्यानें परत येतो, तशी यांच्याशीं राज्यासंबंधाचा व्यवहार करणा-ऱ्या राजे रजवाड्यांची स्थिति झाली. त्यांच्या राज्याचें वजन व किंमत या साहसी वणिजवृत्तीच्या मंडळीचे मुनीम करूं लागले, व ठरवूं लागले. त्या संबंधानें मालकाचें खरें प्रमाण तें अप्रमाण ठरलें. शेवटीं या पेढीची इभ्रत. वजन व दरारा आणि त्यांच्या व्यापाराचा पसारा इतका वाढला कीं, जो त्यांच्या दुकानीं आपल्या वस्तूची किंमत करून घेण्याकरितां येईल त्याच्याच जिन्नसाची किंमत व वजन करण्याचेंच नुसतें ते काम करीत असत असें नव्हे. तर ती तोलल्यावर व तिची किंमत त्यांनीं आपल्याशीं ठरविल्यावर ती जिन्नस किंवा राज्य हें त्याच्याजवळ राहण्यास किंवा ठेवण्यास त्याची पात्रता आहे किंवा नाहीं, हेंही ठरविण्यास त्या मंडळीला व तिच्या मुनिमांना सामर्थ्य आलें. सामर्थ्य अंगीं असल्यावर 'अमुक कर, असेंच झालें पाहिजे. तूं या गोष्टीला पात्र नाहींस. तुझ्याजवळ ही अमोल वस्तु ठेवणें व ती आह्मी ठेऊं देणें म्हणजे ईश्वराच्या घरीं अन्याय होईल.' अशा रीतीचा प्रथम बुद्धिवाद. उपदेश आणि शेवटीं सामर्थ्यवान असल्यामुळें हुकूम करण्याचा स्वसंपादित हक्क ते सांगूं लागले. हक्क मिळाल्यावर त्याची लागलेच अंमलबजावणी सुरू

झाली. इतक्या गोष्टी ज्या मंडळीनें व ज्यांच्या मुनिमांनीं ज्या बुद्धिबलावर केल्या आणि ज्यांनीं त्यांना त्या करूं दिल्या, त्या मंडळीचें, त्यांच्या बुद्धि-बलाचें आणि ज्यांनीं आपली किंमत करून घेतली त्यांच्याही अल्पबुद्धीचें वर्णन करावें तितकें थोडेंच. हिंदुस्थानांत आल्यापासून शंभर सवाशें वर्षांच्या अवधींत शहाणपणानें, नेटानें आणि पडून घर घेण्याच्या कृतीनें इंग्लिश साहसी व्यापारी मंडळीनें आणि त्यांच्या मुनिमांनीं आपल्या तराजूंत माला-च्याऐवजीं राज्यें तोलण्याची आपणाला स्थिति आणली. व्यापार मोठा वा-ढल्यावर त्या दुकानदाराला मग जशी किरकोळ जिन्नस तोलण्याला फुरसत नसते, त्याचा मग मोठ्या प्रमाणावर व्यापार चालतो, तशी इंग्लिश व्यापारी मंडळीला मग किरकोळ जिन्नसाचा व्यापार करण्याला फुरसत होईनाशी झाली. त्यांचा मग तोच व्यापार सुरूं झाला. त्यांचे मुनीम मग राज्यें व त्यांच्या मालकाची पात्रता तोलूं लागले. या मंडळीचे खरें हितचिंतक मुनीम क्लाइव्ह, वारन हेस्टींग, सरजॉनशोअर, लार्ड कार्नवालीस, डलहौसी वगैरे मंडळी होत. या सर्वांनीं हिंदुस्थानचे सर्व प्रांत एका मागून एक तोलून टा-कून, त्यांच्या मालकांची पात्रताही तोलून टाकिली. एवढें मोठें मोंगलाचें उत्तर, (हिंदुस्थान) मध्य, (हिंदुस्थान) आणि दक्षिण हिंदुस्थानांत पसरलेलें राष्ट्र ज्याचें आज चार पांच शतकें कोणी वजन करूं शकला नाहीं. तें राष्ट्र इंग्लिश व्यापारी मंडळीच्या एका साहसी क्लाइव्ह मुनिमानें प्लासीची लुटुपुटीची लढाई मारल्यावर लागलेंच आपल्या तराजूंत घालून एका झपा-ट्याबरोबर तोलून टाकलें आणि अकबराचा वंशज जो शाहाआलम बादशहा तो ही मोंगली राज्यासारखी अमोल वस्तु त्याच्याजवळ राहूं देण्याला अयोग्य आहे, असें ठरवून त्याची किंमत दरसाल फक्त सव्वीस लक्ष रुपयाचीच त्यानें करून टाकिली. एवढे मोठे अकबराच्या पदरचे आणि निजामशाहीच्या पदरचे तोडरमल्ल व मलिकंबर धुरंधर मुत्सद्दी, ज्यांनीं आपापल्या राज्यांतील सर्व जमिनींची जगमान्य मापणी करून त्यांची दरवारी लावून राष्ट्राची जमा-बंदीही केली ना, पण त्यांना देखील त्यांच्या बादशहाची अशी किंमत करता आली नाहीं. या वणिज साहसी लोकांची चतुराई व शिताफीच कांहीं निराळी!

मोंगली राज्याचें वजन आणि आपल्या बादशहाच्या वंशजाची क्लाईव्ह साहेबानें केलेली किंमत आणि ठरविलेली पात्रता पाहून स्वर्गस्थ तोडरमल्लानें त्याच्या शहाणपणाबद्दल आणि शाहाआलम बादशहाच्या मूर्खपणाबद्दल आश्चर्यानें चकित होऊन खास तोंडांत बोटच घातलें असेल. राज्याची मापणी करणें आणि तिची दरबारी ठरविणें हा राजाचा हक्क आहे. तो प्रथम मोंगल बादशहा अकबर यानें बजावला व त्यानें तोडरमल्लाकडून त्याची मापणी करून टाकली. तो अकबराचा ह्मणजे राजाचा हक्क जेव्हां त्याच्या वंशजाकडून इंग्लिश व्यापारी मंडळीकडे आला, तेव्हां त्यांनीं ही मोंगली राज्याची त्यांच्या हक्काप्रमाणें मापणी करून टाकली. फक्त त्यांनीं बादशहाची पात्रता ठरविली व त्याची रौप्यतुला केली एवढेंच काय तें जास्त केलें. फार दिवस हिंदुस्थानांत राहिल्यामुळें आणि हिंदुस्थानांतील प्रांत तोलून त्यांची किंमत इंग्लंडांतील व्यापारी मंडळीच्या पदरांत द्रव्यरूपानें टाकण्याचें काम करता करता कंटाळल्यामुळें क्लाईव्ह साहेबाच्या हातून पारडयाला झोल बसून नजरचुकीनें बादशहाची किंमत वर्षास सव्वीस लक्ष रुपये झाली, ती बरोबर झाली नाहीं. जास्त झाली, असें त्याच्या मागून आलेल्या हेस्तींग साहेबास वाटूनच कीं काय, त्यानें बादशहाची पुनः रौप्यतुला केली. त्यांत पहातों तों खरेंच. बादशहाच्या किंमतीचें पारडें चांगलें दहा लक्षांनीं जड होऊन खालीं गेलेलें त्याला आढळलें. मग एवढी मोठी वजनांत राहिलेली चूक हेस्तिंग साहेब कशी राहूं देतील. व्यापारी रीतिप्रमाणें ‘चूक भूल द्यावी घ्यावी’ हें तत्व सर्व मान्य आहे. तें द्यावी घ्यावी काय, किंवा घ्यावी द्यावी काय, बहुतेक दोनीं सारखींच. गिऱ्हाइकाच्या पदरांत जास्त जिन्नस गेला असल्यास, तो दुकानदारानें काढून घेणें हें खरें तत्व. देण्याविषयींची गोष्ट निराळी असते. त्याप्रमाणें बादशहाच्या दुसऱ्या वेळच्या रौप्यतुलेंत दर वर्षास त्याच्याकडे दहा लक्ष रुपये जे जास्त जात असत, ते हेस्तिंग साहेबानें काढून घेऊन बादशहाची किंमत या वेळेला सोळा लक्ष रुपये करून, इंग्लिश व्यापारी मंडळीचा कांटा दुरुस्त केला. मोंगली राज्याचें वजन करून आणि शाहाआलम बादशहाची किंमत व पात्रता इकडे आल्याबरोबर ठरवून टाकून मग हेस्तिंग साहेब व-

हादुराची स्वारी तोच कांटा घेऊन अयोध्या प्रांताकडे वळली. थोड्या वेळांत या मुख्य मुनिमाला पुष्कळ कामें करावयाचीं असल्यामुळें त्यानें मध्यें मुळींच विश्रांति घेतली नाहीं. अयोध्येस गेल्यावर तेथील बेगमांच्या धनकोशाची त्यांनीं लागलेंच तुला केली. ज्या इंग्लीश व्यापारी मंडळीच्या कांट्यानें उत्तर-हिंदुस्थानांतील मोंगल लोकांचें अफाट राज्य एकाच तोला बरोबर तोलून टाकलें, त्या कांट्यानें बादशहाच्या मृत वजिराच्या असंरक्षित, वृद्ध, अबला-बेगमांच्या धनकोशाचें वजन करण्याला कितीसें कठीण जाणार ! त्याची तुला होत असतां, त्यांचा पुत्र असफ उद्दवला याची त्यांनीं किंमत करून टाकलीच होती; परंतु त्याच्या कमनशिबानें शहाआलम बादशहाप्रमाणें व्यापारी मंडळीच्या कांट्यानें रौप्य तुला करून घेण्याचा मान तो लवकरच स्वर्गवासी झाल्यामुळें त्याला मिळाला नाहीं. नशिब बिचाऱ्याचें! त्याला व्यापारी मंडळीचा काय दोष!! तो मेल्यावर त्याचे दोन पुत्र सादतअलि व वजीरअली या नांवाचे होते. अयोध्या प्रांताची व तेथील धनकोशांची तुला व किंमत पूर्वीच झाली होती. हा प्रांत अयोध्येच्या नबाबाच्या या दोघांपैकीं कोणाही कांदिष्ट, व्यसनी, चैनी, पोराच्या ताब्यांत ठेवणें बरें नाहीं, असें भविष्य पूर्वींच ठरलें होतें. पण या दोघांची पात्रता अद्याप प्रसिद्धपणें व्यापारी मंडळीच्या कांट्यानें ठरली नव्हती. प्रांतांतले सर्वत्र अधिकारी ह्मणजे सारख्या तडफेचे, सारख्या नेटाचे, सारख्या बुद्धिचे, व सगळे काम करण्यांत दक्ष असे सर्व ठिकाणीं असतात, असें नाहीं. त्यांत डावें उजवें असतें. कोणाला अतिशय काम करणें आवडतें. कोणाला जेवढें करावें लागतें तेवढेंच करून स्वस्थ बसणें व उगीच ढवळाढवळ ज्या त्या कामांत करून पुढें पुढें न करणें आवडतें. पण अशा स्वस्थ बसणाऱ्या मनुष्याला सुद्धां त्याच्या मर्जीविरुद्धही थोडेंसें तरी तो नोकर असल्यामुळें काम करावें लागतेंच. इंग्लीश व्यापारी मंडळीचे पहिले दोघे मुख्य मुनीम, क्लाइव्ह आणि हेस्टिंग हे या प्रकारच्या स्वभावाचे होते. त्यांच्या पश्चात् आलेले शोअर साहेब हे दुसऱ्या प्रकारच्या स्वभावाचे ह्मणजे उगीच ढवळाढवळ करून काम उकरून काढणाऱ्यापैकीं नव्हते. पण तेही व्यापारी मंडळीचे नोकर असल्यामुळें, जरी त्यांना क्लाइव्ह व हेस्टिंग यांच्या-

प्रमाणें या प्रांताची तुला कर, त्याची दरवारी ठरीव, त्याचें वजन कर; त्या प्रांताच्या मालकाची पात्रता ठरीव, वगैरे कामें करायला नको होतें. असा जरी त्यांचा स्वभाव होता तरी त्यांच्या मर्जीविरुद्ध अयोध्येचा नबाब असफ-उद्दवला याचा भाऊ व मुलगा जे दोघे वारस होते त्यांची प्रसिद्धपणें तुळा करून पात्रता ठरविण्याचें काम त्यांना करण्याची पाळी आली. निरुपाय होऊन सरजॉन शोअर साहेबांना हें काम करणें भाग आलें, तेव्हां हे साहेब बहादूर आपल्या मुख्य प्रतिष्ठान नगरीमध्यें सभेच्या मुख्य स्थानीं आपल्या मदतनिस मंडळीसह व्यापारी मंडळीचा राज्यें व राजे यांची तुलना करण्याचा काटा पुढें ठेवून विराजमान झाले. प्रसिद्धीस आलेल्या व नांवारूपाला चढलेल्या या व्यापारी मंडळीच्या काट्यासंबंधानें कोण शंका घेणार? शोअर साहेब मुख्यस्थानीं येऊन बसल्यावर त्या काट्याच्या तराजूंत प्रथम असफउद्दवल्याचा मुलगा जो वजीरअली त्याची अयोध्येच्या गादीवर बसण्याची पात्रता आहे कीं नाहीं, हें ठरविण्याचें काम सुरू झालें. इकडे हें काम चालतें असतां तिकडे दुसरा वारस जो सादतअली त्याची योग्यता यावेळीं काय होती, तें पाहिलें पाहिजे.

सादतअली हा असफउद्दवल्याचा भाऊ होता. हा त्याच्या कारकीर्दींत आपल्या जिवाला कांहीं तरी अपाय होईल या भीतीनें दरबारच्या आणि भावाच्या कृष्ण कारस्थानांपासून दूर काशीस राहत होता. त्यावेळेस त्याला नवाबाच्या खजिन्यांतून दीड लक्ष रुपयांची वार्षिक नेमणूक मिळत होती. त्याची यावेळीं हीच किंमत होती. ती नेमणूक घेऊन तो आपल्या जिवाला कांहीं अपाय न होवो, अशी ईश्वराजवळ रात्रंदिवस प्रार्थना करीत व त्याबद्दल चिंता वहात गंगेच्या काठीं काशीवास करींत आपल्या आयुष्याचे दिवस कसे तरी कंठीत राहिला होता. त्याचा वडील भाऊ असफउद्दवला अयोध्येच्या गादीवर बसून दुर्दैवानें नामशेष करून टाकलेल्या व राज्यापैकीं स्वसत्तेचा जमिनीचा एक तुकडाही ताब्यांत नसलेल्या मोंगल बादशहाची वजिरी. जोंपर्यंत इंग्लिश व्यापारी मंडळ आणि त्यांचे मुनीम यांच्या कृपाप्रसादानें. हाकीत होता, तोंपर्यंत त्याला त्याची किंमत जास्त वाढण्याची मुळींच आशा

नव्हती. पण तो जेव्हां इ० स० १७९७ त महंमद पैगंबराच्या गुलिस्तानांत ऐषआराम करण्याकरितां या लोकाहून निघून गेला, तेव्हां त्याच्या पाठीमागें अयोध्येच्या गादीचा खरा औरस वारस दुसरा कोणी नसल्यानें, आपणच वारस आहोंत असें सादतअल्लीला वाटून, त्याच्या हयातींत नाहीं तर नाहीं, पण त्याच्या पश्चात् तरी आपली किंमत आतां जास्त चढेल अशी त्याला आशा वाटूं लागली होती. पण ती त्याची आशा यावेळीं सफळ झाली नाहीं. ती सफळ होण्याला आणखी कांहीं दिनावधी लोटायला पाहिजे होता. तेव्हां त्याला यावेळीं त्याची पूर्वीचीच नेमणूक उर्फ किंमत ह्मणजे दीड लक्ष रुपये सालीना घेऊन आणखी कांहीं दिवस वाट पहात बसावें लागणार होतें; आणि त्याप्रमाणें तो काशीस माळेचे मणी ओढीत बसला होता. यावेळीं तिकडे इंग्लिश व्यापारी मंडळीचे निरुपद्रवी व सत्वस्थ मुख्य मुनीम सरजान शोअर वजीरअल्लीची पात्रता स्वस्थपणानें त्याच्या गुणांचें, हक्काचें, वयाचें, त्याच्या धनदौलतीच्या प्रमाणाचें, अशीं अनेक वजनें घालून, तीं पुनः काढून, पुनः काट्यांत घालून आणि त्याच्याकडे पाहून ठरवीत होते. बहुतेक हीं सर्व वजनें त्याच्या पासंगालाच लागलीं. याशिवाय इंग्लिश व्यापारी मंडळीचे हे निरुपद्रवी मुनीम आपला किनमोल वेळ खर्चून जें हें काम मोठ्या निरपेक्ष बुद्धीनें अयोध्येच्या रयतेच्या कल्याणाकरितां करीत होते, त्या वेळेची किंमत आणि त्यांची मेहनत, याबद्दल वजीरअल्लीकडून दलाली काय मिळेल हेंही वजन त्यांत त्यावेळीं इतर वजनांबरोबर टाकून त्याचा जडपणा पहात होते. वजीरअल्लीचें वर ज्या अनेकविध गुणवजनांनीं वजन चाललें होतें, त्या वजनापेक्षां हें मागचें वजन दृष्टीला जरी अदृश्य होतें, तरी तें वजनानें मोठें जड होतें. ज्या कागदावर मोठमोठे व्यापारी लोक लाखो व कोट्यवधी रुपयांची हुंडी लिहितात, त्या कोऱ्या कागदाचें वजन प्रथम कितीसें असतें? एक रतिभर असेल किंवा नसेल. त्याचप्रमाणें नुसत्या दौतींतील शाईचें वजनही एक टांकभर जेम तेम असतें. इतर मंडळीच्या दौलतींत टांकाच्याही वर शाई असते, इतकेंच नव्हे तर ती कित्येक वेळां तोंडतोंड भरून सांडून जाण्याइतकी ही असते. पण व्यापारी मंडळीच्या दौलतीची गोष्ट तशी नसते

लेखणीचा टाक बुडण्या इतकीच तिच्यांत शाई असते. जणूं काय त्या दोघां-मध्यें एकीची अंग चोरण्याची आणि दुसऱ्याची तिचा ठाव पहाण्याची चढा-ओढ एकसारखी झालेली असते. अशा एक रतिभर कागदाचें आणि टाक-भर शाईचें तें वजन कितीसें असतें. तें कांहीं खरोखर जमेस धरण्यासारखें नसतें. पण लेखणीवाईच्या संयोगानें त्या दोघांचें वजन लागलेंच इतकें होतें कीं, शंकराच्या जटेंतील एका केसानें कुबेराची संपत्ति आणि विष्णूचें त्रैलो-क्यांतील वैभव हेंही ज्याप्रमाणें पार तोलून टाकून त्याच्या संपत्तिचा ठाव पाहिला, त्याप्रमाणें हा हुंडीचा कागद नवकोट नारायण जरी असला तरी त्याच्या धनकोशाचें वजन करून टाकतो. इतकी त्रैलोक्यांतील संपत्ति त्याच्या भाराला घातली तरी देखील त्या केंसाचें पारडें जसें हलकें झालें नाहीं, तें पूर्वीप्रमाणेंच जड होतें, तसेंच या हुंडीच्या कागदाचेंही पारडें, नवकोट ना-रायणाच्या धनकोशाचा जरी तें ठाव पाहतें व त्याचें दिवाळेंही काढतें तरी तें वेळेला हलकें होत नाहीं. त्या केंसाच्या वजनांत जसें अगम्य. अतर्क्य असें कांहीं होतें, तसेंच कांहीं अगम्य व अतर्क्य असें व्यापारी मंड-ळीच्या या हुंडीच्या कागदांतही असतें. त्याप्रमाणेंच इंग्लिश व्यापारी मंड-ळीच्या त्या मुनिमानें वजिरअल्लीचें वजन करतांना जें मागून दुसरें लहानसें वजन टाकून ठाव पाहिला, त्याचें वजन तसेंच अगम्य होतें. शंकराच्या जटेंतील केंसाचें वजन जसें एकट्या शंकरालाच काय तें प्रथम माहित होतें, व हुंडीचें वजन जसें ती लिहिणारालाच माहित असतें, तसें सरजॉन शोअर साहेबांनीं मागून टाकलेल्या व्यापारी मंडळीच्या दलालीच्या वजनाचें वजन फक्त काय तें त्यांनाच प्रथम माहित होतें.

वजिरअल्ली हा असफउद्दवल्याच्या जनानखान्यांतील अनेक नवयुवती ज्या त्याच्या कृपाप्रसादाला पात्र झाल्या होत्या, त्यापैकीं एकीच्या पोटीं झाला होता. तेव्हां लोक समजुतीप्रमाणें त्याच्या औरसपणाबद्दल दरबारच्या कांहीं सरदार मंडळींना मोठा संशय होता. पण असफउद्दवला जिवंत असतांना त्याच्या पुत्राबद्दल असा संशय घेण्याची कोणाचीही छाती नव्हती. ते सर्व असफउद्दवला जसा त्याला आपलाच पुत्र आहे असें मानीत होता, तसेंच

सर्वांनाही मानणें भाग होतें, आणि त्याप्रमाणें सर्वजण त्याला त्यावेळीं मानीतही होते. दरबारच्या मंडळींत जसा त्याच्या जननाबद्दल संशय होता, तसाच जनानखान्यांतही संशय होता. पण असफउद्दवल्यानें त्याच्या हयातींत त्याला आपल्या राज्याचा वारस कबूल केला असल्यानें आणि त्याची मुख्य बेगम आणि त्याची वृद्ध आई यांनीं त्या गोष्टीला आपली संमति त्यावेळीं दिली असल्यानें, त्याच्या वारसपणाबद्दल व त्याच्या गादीवरल्या हक्काबद्दल मुळींच संशय राहिला नव्हता. वजिरअलीचें वय असफउद्दवला मरण पावला तेव्हां तेरा वर्षाचें होतें. तो इतका उदार होता कीं त्याला "अतिशय उधळ्या" हेंच त्याच्या औदार्याला नांव शोभत होतें. मोठा माथेफिरू, चैनी, बाहेरख्याली, अशा स्वभावाचा हा राजपुत्र असून शिवाय अकलेची आणि चांगल्या गुणांची व त्याची पहिल्यापासूनच फारकत झाली होती. अशा अनेक गुणांनीं मंडित असलेल्या या नबावपुत्राबद्दल असफउद्दवला जिवंत असतांना तक्रार निघाली नाहीं. पण तो मरण पावल्यानंतर अयोध्येची गादी या नवीन नबावांना मंडित होण्याची जेव्हां खरोखर वेळ आली, तेव्हां दरबारचा मुख्य वजीर जो झाहासीरअली त्यानें आणि त्याच्याच कांहीं अनुयायांनीं, वजिरअलीच्या औरसपणाबद्दल प्रसिद्धपणें वादविवाद करून अडथळा आणला. दरबारांत जसा या वजिराचा एक पक्ष होता, तसा वजीरअलीचाही एक पक्ष होता. त्या दोनी पक्षामध्यें या योगानें तंटा सुरू झाला. दोघांत तंटा लागला ह्मणजे त्याचा निकाल आपसांत तडजोडीनें करण्याचें हिंदुस्थानच्या हवेला मानेनासें झालें आहे. तो निकालाकरितां तिसऱ्याकडे नेणें कांहीं वाईट नाहीं व तो जो न्याय देईल तो कबूल करणें ही कांहीं वेडेपणाची गोष्ट नाहीं. पण तो आपल्यापेक्षां आपल्याचपैकीं चार शहाण्या गृहस्थापाशीं नेणें जास्त शहाणपणाची गोष्ट असून, ती पूर्वीची पद्धत हिंदुस्थानांतील मंडळींना मात्र नकोनाशी झाली आहे. ती, आपल्या जातीचे नाहींत, धर्माचे नाहींत, आपले आचार विचार, रीतिरिवाज ज्यांना माहित नाहीं, अशा परक्या लोकांकडे नेण्याची गोडी लागली आहे. या स्वभाव धर्माप्रमाणें या दोनी पक्षाच्या या वादाचा निकाल करण्याकरितां आणि वजीरअलीची किंमत व पात्रता ठरवून घेण्याक-

रितां हे दोनी पक्ष इंग्लिश व्यापारी मंडळीच्या दुकानीं गेले. आतां मोठें गिऱ्हाइक दुकानीं आलें ह्मणजे सभ्यरीतीला व व्यापारी पद्धतीला अनुसरून त्याला 'या. बसा. करून' त्याचें जें काम असेल तें प्रथम करून द्यायचें आणि मग आपल्या मेहनतीबद्दलच्या दलालीची गोष्ट मोठ्या नम्रपणानें. आदब राखून. मान लववून, निवडक, मधुर व थोडक्या शद्बांनीं आणि सस्मित हास्य ओष्ठ प्रांताच्या एका बाजूला किंचित दाखवून हलकेंच त्याच्या कानांत सांगण्याची सभ्य रीत आहे. ती किंमत ऐकून गिऱ्हाइकाच्या मुखावर स्मितहास्य रहात नाहींच, तो ती ऐकून विस्मयचकित होतोच. पण तिकडे लक्ष पुरविण्याचें दुकानदाराला कारण नसतें. हा मोठ्या नांवाजलेल्या पेढीचा शिष्ट सांप्रदाय फक्त शिष्ट लोकांकरितांच असतो. एवढें लक्षांत ठेवलें पाहिजे. गरीब बिचारें गिऱ्हाईक त्या पेढीवर जात नाहींच ह्मणा, कारण त्या पेढीचा थाटमाट पाहूनच द्वारकेंतील श्रीकृष्णाच्या दरबारांत जीर्ण वसनांत बांधलेली दारिद्र्याची दीपिका व कक्षेंत लपविलेली मुष्टीभर पृथुची पुरचुंडी बाहेर काढण्यास सुदामा ब्राम्हणाला विस्मय वाटून तो जसा गांगरून गेला. तसाच प्रकार गरिब गिऱ्हाईकाचा तें तेथें गेलें ह्मणजे होतो. त्याला आपल्या स्थितीचीच प्रथम लाज वाटूं लागते. पण हें लक्षांत पक्कं ठेवलें पाहिजे कीं. श्रीकृष्णाच्या घरीं सुदामा गरीब ब्राह्मणाचा जसा पाहुणचार झाला, तसा तेथें होण्याची मात्र त्यानें आशा करूं नये. त्या संबंधाच्या नियमांत आलीकडच्या काळांत कालपरत्वें पुष्कळ फेरफार झाले आहेत. तेथें कोणाचाच उपाय नाहीं. हा सर्व कालमहिमा आहे.

इंग्लिश व्यापारी मंडळीच्या कलकत्त्याच्या मुख्य पेढीवर मुख्य मुनिमासमोर हे दोन पक्ष मोठें गिऱ्हाईक वजिरअलीची पात्रता व किंमत करून घेण्याकरितां आल्याबरोबर व्यापारी पद्धतीप्रमाणें त्यांचें काम प्रथम करून देण्याचें नाईलाजास्तव सरजॉन शोअर साहेबांनीं पतकरलें आणि मागें सांगितलेल्या त्याच्या गुणवजनांनीं त्याची किंमत व पात्रता काय आहे, हें त्या पक्षास सांगितलें. यावेळीं इंग्लिश व्यापारी मंडळीच्या काट्यानें वजिरअलीची किंमत कोट्यवधी रुपयांची होऊन मुख्य मुनिमाच्या मतानें या षोडश वर्षा-

च्या तरुण नबाबाची पात्रता अयोध्येच्या राजलक्ष्मीला वरण्याची आहे अशी ठरली. मग काय विचारावें. एक पक्षाचा आनंदोदधि वर येऊन उचंबळूं लागला; व तो आतां मर्यादेचें आक्रमण करतो कीं काय असें सर्वांस वाटूं लागलें. दुसरा पक्ष अर्थातच निराशा दरींत खोल ठिकाणीं जाऊन पडला. तिसऱ्या प्रबळ पक्षाकडे न्याय मागायला हे दोन पक्ष गेले असल्यानें त्यांना इंग्लिश व्यापारी मंडळीच्या मुनिमानें जो हा न्याय दिला त्याली आपली मान्यता दाखवूनच परत यावें लागलें. हाच न्याय जर त्यांना त्यांच्याच स्वजातीयापैकीं तिसऱ्या चारचौघा शहाण्यांनीं दिला असता, तर निराश झालेल्या पक्षानें त्या न्याय देणाऱ्या मंडळीच्या रक्तानें तेंच त्यांचें न्यायासन लाल करून सोडलें असतें. पण येथें त्यांचें कांहीं एक चालण्यासारखें नव्हतें. त्यांना या इंग्लिश व्यापारी मंडळीनें सामर्थ्य जरी ते हातांत कांटा घेऊन व्यापारच करीत होते, तरी पूर्णपणें त्यांच्याच बेगमावर एका मुनिमाऱ्याच नाराजीनें गुदरलेल्या प्रसंगामुळें माहित झालें होतें. शिवाय काशीचा राजा चेतसिंग याचें ताजें उदाहरण त्यांच्या डोळ्यांपुढें होतेंच. हा निकाल दिल्याबरोबर दुसरा निराश झालेला पक्ष मुकाट्यानें परत गेला हें खरें. पण न जाणो, हिंदूच्या सत्वस्थ आणि शांत स्वभावापेक्षां तावडतोब तप्त होणाऱ्या महंमदाच्या अनुयायांच्या रक्ताची आणि त्यामुळें होणाऱ्या परिणामाची त्या शहाण्या, सावध व धूर्त व्यापारी मंडळींना चांगली परीक्षा होती व अनुभवही पुष्कळ आलेला होता. त्यामुळें त्यांनीं आपल्या सावधपणांत कमतरता न करितां लखनौ येथील आपल्या छोट्या मुनिमाला खलिता पाठवून नबाबाच्याच खर्चानें ठेवलेली, पण तिच्यावर नबाबाची मुळींच सत्ता नसलेली जी व्यापारी मंडळीची तैनाती फौज होती, तिच्या तोफखान्याच्या दणदणाटांत वजीरअली हा अयोध्येचा नबाब झाला, असें त्याच्या रयतेला व सर्व जगाला महशूर केलें. त्या तोफेच्या दणदणाटानें एवढेंच सर्वांना जाहिर केलें असें नाहीं, तर त्याबरोबर इंग्लिश व्यापारी मंडळीचें सामर्थ्य किती आहे, हेंही पुनः जाहिर केलें. हें जें अयोध्येच्या या नवीन नबाबाचें इंग्लिश व्यापारी मंडळीनें मोठें काम करून दिलें, त्याच्छाबद्दल त्यांची जी दलाली होती,

तिची रक्कम मग हलकेंच तरुण नबाबाच्या कानांत सांगितली. त्या पोराला त्या रकमेबद्दल त्या वेळेस कांहींच वाटलें नाहीं. त्यानें उलट त्यांचे आभार मानून व हास्यवदन करून मोठ्या आनंदानें ती देण्याचें कबूल केलें. व्यापारी पद्धतीप्रमाणें ह्मणजे रोखीचा सवदा जितका चांगला आणि दोनी पक्षाला हितकर असतो, तितका उधारीचा नसतो. व्यापारी मंडळीच्या ऐवजाबद्दलचा तगादा लागून पुढें नबाबाच्या आनंदांत विरजण पडूं नये व ऐषआरामांत उगीच व्यत्यय येऊं नये ह्मणून त्यांनीं आपला ऐवज त्याच आनंदोत्सवाच्या खर्चांत पटवून घेऊन ती व्यापारी मंडळी लागलेच मोकळी झाली. तरी दलालीची मोठी बाकी एवढ्या मोठ्या गिऱ्हाइकाकडे ठेवली तर त्यांचें दुकान कसें चालणार? देण्याघेण्याचा व्यापार करणारा सावकार दिलेल्या रकमेच्या व्याजाकरितां जितका धडपडत असतो आणि तें प्रथम वसूल करून घेण्याकरितां जितका उतावीळ असतो, तितका मुद्दल रकमेबद्दल नसतो. ती त्याची केव्हांच बुडत नाहीं व तो ती बुडूंही देत नाहीं. तेव्हां या मंडळीनें अयोध्येच्या नबाबासारख्या मोठ्या गिऱ्हाइकाकडून प्रथम आपली दलालीची रक्कम तावडतोब जी वसूल करून घेतली ती याच हेतूनें. अशा मोठ्या गिऱ्हाइकाकडून अशा मोठ्या महत्वाच्या कामाबद्दल असे मोठे पेढीवाले जी दलालीची रक्कम घेणार ती लहानसान कशी असूं शकणार? ती कामाच्या मगदुराप्रमाणें आणि दोघांच्या इभ्रतीप्रमाणेंच असणार, यांत नवल काय. ती तशीच होती. तिचा नक्की आंकडा आतांच प्रसिद्ध करणें हें व्यापारी पद्धतीला अनुसरून नाहीं, ह्मणून आम्हीही तो या वेळीं प्रसिद्ध करीत नाहीं. कारण, कोणतीही बरी, वाईट, गोष्ट दुकानीं झाली तरी ती अत्यंत गुप्त ठेवणें अथवा ती तशी आहे असें भासवणें व सांगणें हेंच व्यापाराचें खरें तत्व आहे. त्याप्रमाणें या सर्व बारिक सारिक गोष्टी अत्यंत गुप्तपणानें झाल्या. वजीरअली हा अयोध्येचा नवाब झाला ही अखेरची गोष्ट मात्र तोफांच्या धडाक्यानें लोकांच्या कानटळ्या बसवून प्रसिद्ध झाली.

लखनौ पासून काशी हें पुण्यक्षेत्र ८५ कोस दूर आहे. तेथें सादतअली, वजीरअलीचा चुलता रहात होता. वजीरअली अयोध्येचा नवाब झाल्याबद्दल

लखनौ येथें जो तैनाती (कॉन्टीन्जन्ट) फौजेच्या तोफांचा दणदणाट झाला. तो त्याला इतक्या अंतरावर ऐकूं गेल्याखेरीज कसा राहील. त्याच्या कर्णी तो तोफांचा दणदणाट पडल्याबरोबर, त्याचें अंतःकरणही दणदणून गेलें. यावेळपर्यंत आपली किंमत आपल्या वारसपणाच्या हक्कानें खास जास्त झाल्याखेरीज राहणार नाहीं असें त्याला वाटत होतें. पण त्याची आजपर्यंतची आशानौका जी यावेळपर्यंत उत्साहाच्या उंच लाटेवर विहार करीत होती. ती दुसऱ्या लाटेबरोबर पार खोल खालीं गेली. सादतअलीच्या मनाची तिकडे तशी स्थिति झाली खरी, पण त्याचा अयोध्येमध्यें जो पक्ष होता आणि ज्याचा या निकालामुळें हिरमोड झाला होता, तो त्याच्या इतका निराश झाला नाहीं. नवीन लावलेलें झाड थोडेसें छाटलें ह्मणजे, तें जसें जास्त जोरानें फोंफावत जातें, तसें या पक्षाचें झालें. आपला हेतु वाटेल त्या रीतीनें शेवटास नेण्याचा त्या पक्षानें मग विडाच उचलला आणि तो नंतर त्या प्रयत्नाला लागला.

आपल्याविरुद्ध दरबारांत मोठा पक्ष आहे व त्याचीं सर्व सूत्रें वजीर जहासीरअली याच्या हातांत आहेत, हें वजीरअलीला लागलेंच कळून आलें. त्यानें त्याचा अधिकार काढून घेऊन त्याला घरीं बसविलें आणि जो कोणी त्याच्याकडे जाईल त्याच्यावर नबाबाची खपा मर्जी होईल, असें सर्वांना कळविलें. जहासीरअलीला पदभ्रष्ट केल्यामुळें त्याला जास्तच चीड आली आणि आतां तर तो वजीरअलीचा पक्काच वैरी बनला. शिवाय रिकामपणामुळें वजीरअलीच्या विरुद्ध कारस्थानांचें बळकट जाळें मोठ्या सावधपणानें विणण्याला त्याला आतां वेळही पुष्कळ मिळूं लागला; तो फुकट न घालवितां त्याप्रमाणें करण्याचा त्यानें आपला प्रयत्न कोळ्याप्रमाणें एकसारखा चालू ठेवला आणि त्याचे धागे लांववर नेऊन गुंतवून टाकून तें आपलें जाळें विणलें. त्या जाळ्यांत त्यानें प्रथम असफउद्दवल्याची बायको व त्याची स्त्री या बेगमांना मक्षिकेप्रमाणें ओढल्या. त्यांचे पाय त्याच्या कारस्थानाच्या धाग्यांत अडकल्याबरोबर त्या वृद्ध अबला तेथेंच गुंतून पडल्या. त्यांना आपल्या कबजांत घेतल्यानंतर मग त्यानें त्या बेगमांपेक्षां दुसऱ्या एका वजनदार मनुष्यावर झडप घालून त्यालाही आपल्या जाळ्यांत अडकवून टाकलें. हा

मनुष्य इलमासअल्लीखान होय. हा सर्व अयोध्या प्रांताचा इजारदार होता. सर्व राज्याचा वसूल त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें त्याच्याकडे जमा होत असे. या इजाऱ्यामुळें त्याचें वजन पूर्वीपासून दरबारांत जास्त होतेंच, शिवाय त्याच्याजवळ धनसंचयही चांगला होता. हा प्रथम सुजाउद्दवल्याच्या जनानखान्यांत एक खोजा होता. तेथें देवडीवर बसून चौकी पहारा करण्याचें त्याचें काम होतें. पुढें त्याच्या कर्तबगारीनें आणि शहाणपणानें तो इतका वाढला कीं 'अयोध्या प्रांताचा मुख्य इजारदार बनला.' त्यायोगानें लवकरच राज्यांत त्याचें मोठें प्रस्थच होऊन बसलें. याच्यावर इंग्लिश व्यापारी मंडळीची कृपादृष्टि नव्हती. त्यांच्या सल्लामसलतीनें जेव्हां असफउद्दवल्याच्या कारकीर्दीत राज्याचा सर्व कारभार चालूं लागला, तेव्हां त्यांनीं त्याला घरीं बसविलें. एकच धंदा करणारे दोन इसम एके ठिकाणीं सलोख्यानें राहणें फारसें संभवनीय नाहीं. त्यांतून व्यापारांत तर मुळींच शक्य नाहीं. दोघांनाही सर्व व्यापार आपल्या एकट्याच्या हातांत राहून, सर्व नफा एकट्यालाच मिळावा असें साहजिकच वाटतें. तेव्हां जो तो आपला डाव कसा साधेल ती संधि पहात होता. प्रथम इलमासअल्लीनें सुजाउद्दवल्याच्या कारकीर्दीत त्याला संधि मिळाली, तेव्हां त्यानें आपला डाव साधून घेतला. मागून इंग्लिश व्यापारी मंडळीला असफउद्दवल्याच्या कारकीर्दीत संधि सांपडली तेव्हां त्यांनीं आपला डाव साधून घेतला. हा इल्मासअल्ली प्रथम जनानखान्यांत नोकर असल्यानें आणि जात्या फार चाणाक्ष असल्यानें, जनानखान्यांतील प्रत्येक बारिक सारिक गोष्ट कितीही नाजुक व कितीही गुह्य असली तरी ती त्याच्या बहिरीससाणाच्या चाणाक्ष व तीव्र नजरेप्रमाणें दृष्टीतून चुकून जात नसे. त्याच्याजवळ ज्याप्रमाणें द्रव्याचें भांडार भरलेलें होतें, त्याप्रमाणें जनानखान्यांतील असंख्य गुह्य गोष्टींचेंही भांडार भरपूर भरलेलें होतें. त्यांत वजीरअलीच्या जननाचें रहस्यही सांठविलेलें होतें. अशा मोठ्या वजनदार इलमासअल्लीला जहासीरअल्लीनें आपल्या मोठ्या बिकट कटांतच नुसतें आणून सोडलें असें नाहीं, तर त्याला त्यानें द्रव्यभांडार व राजरहस्यांचें भांडारही मोकळें करण्यास लाविलें आणि त्याप्रमाणें या इलमासअल्लीनें आपलीं दोनीं भांडारें त्या

जहासरिअलीपुढें मोठ्या खुषीनें मोकळीं केलीं. मग काय विचारता! जहासीरअलीच्या पक्षाला दुप्पट जोर आला. जगावर जेथें जेथें राज्यें पसरली आहेत व जेथें जेथें तीं पसरण्याचें काम अनादि कालापासून या घटकेपर्यंत चालू आहे आणि पुढेंही चालू राहील, तेथें तेथें त्या संबंधाची कारस्थानेंही चालूच असणार! पायानें प्रवास करणाऱ्या मनुष्याला जसा त्याचा पुढचा लांबवरचा मार्ग, जरी त्याला मध्यें पुष्कळ वळणें असलीं तरी सरळच दिसतो, तसा राज्यकारस्थानांचा मार्ग नुसता लांबवर व वरवर पाहिले ह्मणजे सरळच दिसतो. जसजसें त्याच्या जास्त जवळ जवळ जावें तसतशी त्यांतली भयंकर वळणें व खड्डे मग त्या दुसऱ्या रस्त्यांतील वळणाप्रमाणें स्पष्ट दिसूं लागतात आणि नंतर मग तो प्रथम जितका सरळ दिसत होता, तितका तो सरळ नाहीं, अशी खात्री होते. हे राज्यकारस्थानांचे युरोपांत मार्ग तेवढे सरळ असतात आणि एशियांतले नसतात असा कांहीं प्रकार नाहीं. दोनी देशांतले नव्हे, जगांतील सर्व देशांतले हे राज्यकारस्थानांचे राजमार्ग असेच प्रथम सरळ दिसतात, पण त्यांत पुष्कळ वळणें व मोठमोठे खळगे असतात. 'राज्यकारस्थानी पुरुष आणि त्यांच्या रीति ह्मणजे प्रसिद्ध पण सभ्य तस्करराज व त्याच्या राजरोस कृति,' अशीच एका युरोपस्थ महा पंडितानें त्यांच्या व त्यांच्या कृत्यासंबंधानें व्याख्या केली आहे. ती फक्त एशियांतील राज्यकारस्थानी पुरुषाला लागूं आहे, असें त्यानें ह्मटलें नाहीं. मग युरोपांतील शाहण्यांनीं एशियांतील राज्यकारस्थानी पुरुषांना व त्यांच्या कर्त्यांना नांवें ठेवणें ह्मणजे एखाद्यानें आपल्या तोंडानें आपली स्तुति करून दुसऱ्याच्या अंगीं जे दुर्गुण असतील ते आपल्या अंगीं असून, त्यावर आवरण घालून ते झांकून टाकण्याची खटपट करण्याइतकेंच शहाणपणाचें कृत्य आहे. त्याच्या त्या कृतीबद्दल जशी मग त्याची फजिती होते व त्याची बाजू त्याच्याच अंगावर येऊन त्याला मग स्वस्थ बसावें लागतें, तशीच स्थिति याबद्दल एकमेकाला एकमेकानें नांवें ठेवणाऱ्या युरोपस्थ राज्यकारस्थानी पुरुषाची व त्यांच्या स्तुतिपाठकांची झाल्याशिवाय रहात नाहीं. आतां एकाला दुसऱ्याबद्दल स्पष्ट बोलण्याला व त्याला नांवें ठेवण्याला सामर्थ्य कालानुसार आलें

असतें. ह्मणून तो शांभवी किंवा सुरादेवीचा प्रसाद एखाद्यावर झाला असता, त्याला वाटेल तें बडबडण्याची मोकळीक जशी जनसमूहाकडून सभ्यरीतीला अनुसरून तेवढ्या वेळे पुरतीच दिलेली असते, त्याच्या तोंडीं त्यावेळीं जसें कोणी लागत नाहीं, तशीच मोकळीक सामर्थ्यवान राज्यकारस्थानी पुरुषाला त्या वेळेपुरतीच दिलेली असते. त्याच्याशीं वाग्युद्ध करण्याची कोणीच इच्छा करीत नाहीं. सुरादेवीच्या प्रसादाचा डोळ्यावरचा अंमल कमी झाल्यावर जसा तो मग शुद्धिवर येतो आणि त्या अंमलांत दुसऱ्यावर घेतलेल्या तोंडसुखाबद्दल व त्याच्या मूर्खपणाबद्दल, त्यालाच मग ज्याप्रमाणें लाज वाटूं लागते, त्याचप्रमाणें एका राज्यकारस्थानी पुरुषानें राज्य बलवैभवादि अंमलाच्या धुंदींत दुसऱ्यावर त्यावेळीं मोठ्या शहाणपणानें केलेल्या भलत्यासलत्या आरोपाबद्दल त्याला लज्जेनें खालीं मान घालावी लागते. याबद्दल ते दुसऱ्यावर तोंडसुख घेणारे दोघेही खरोखर दोषी नाहींत. हा सर्व त्या सुरादेवीचा व त्यांच्या वैश्वर्याच्या अंमलाचा दोष आहे. ती सेवून करणाऱ्याची व तें दैवानें प्राप्त झाल्यामुळें धुंदि चढलेल्याची अशीच स्थिति व्हावयाची ! अशी स्थिति जर झाली नाहीं तर मात्र नवल ! यावरून अयोध्येच्या दरबारांत जहासीरअलीनें वजीरअलीच्या विरुद्ध जें कारस्थान चालविलें होतें, त्यावरून एका युरोपांतील शाहण्यानें एशियांतील सर्व राज्यकारस्थानी पुरुषांना अधम आणि त्यांच्या कृत्यांना जर नीचपणाचीं कृत्यें अशीं शेलकीं विशेषणें सरसकट देऊन टाकलीं, तर त्याच्या शहाणपणाच्या या तुटलेल्या ताऱ्याबद्दल दारूच्या बाणांतून सुटून उंच आकाशांत उडून व फुटून गेलेल्या ताऱ्याप्रमाणें त्याकडे क्षणभर चकित दृष्टीनें पहात राहणें हेंच बरें ! बाणांतून तुटून गेलेल्या ताऱ्यांची खालीं येईपर्यंत जशी स्थिति होते, ह्मणजे ते थोडक्या अवकाशांत नामशेष होऊन जातात, तशीच याच्याही या अक्कलेच्या तोडलेल्या ताऱ्यांची स्थिति कालांतरानें होते. अशा या पंडिताला काय ह्मणायचें असेल तें स्पष्टपणानें त्याच्या तोंडावर सांगण्याची तितकी अवश्यकता नाहीं व व्यापारी पद्धतीप्रमाणें तें स्पष्टपणें सांगणें हेंही बरें नाहीं. त्याची किंमत काय ती मनांत ज्यानें त्यानें ठरवावी.

जहासीरअलीनें आपल्या कारस्थानाच्या जाळ्यांत बेगम व जहासीरअली यांना अडकवून टाकल्यावर, त्यानें मग व्यापारी मंडळीचा लखनौ येथील छोटा मुनीम यालाही त्याच जाळ्यांत अडकविण्याचा प्रयत्न केला, व त्याच्या सुदैवानें तो सावध व धूर्त मुनीमही त्यांत अचानक सांपडला. त्यानें इलमासअलीप्रमाणें त्यालाही वजीरअलीच्या विरुद्धच्या पारड्यांत त्याचें वजन मोठ्या खुषीनें टाकण्यास कबूल केलें. झालें, लखनौ येथें इंग्लिश व्यापारी मंडळीच्या छोट्या मुनिमानें व्यापारी मंडळीचा कांटा आपल्या राहत्या बंगल्यांत उभारून एका पारड्यांत तरुण सोळा वर्षाच्या नुकत्याच गादीवर बसलेल्या वजीरअली नबाब पोराच्या नांवची चिठ्ठी टाकून, दुसऱ्यांत माजी जहासीरअली मुख्य वजीर, बेगमा. इलमासअली व त्याची दोन रहस्य व द्रव्य याचीं भांडारें आणि लखनौ येथील व्यापारी मंडळीचे छोटे मुनीम, इतकी वजनें पडलीं, आणि त्याची तुलना लखनौ येथील छोटे मुनिमाच्या बंगल्यांत सुरू झाली. आलीकडे अतिशय सूक्ष्म वजन करण्याचा निघालेला कांटा. ज्याला केंस, किंवा वाऱ्यानें उडून येणारा कणही वजनांत सोसत नाहीं, तो चुकून अथवा उडून आला असता जशीं त्याची पारडीं खालवर होतात, ह्मणून त्याला वाऱ्याचाही संपर्क न होईल अशा तावदानी व बंदोबस्ताच्या पेटींत तो ठेवून तेथें जसें गुप्तपणें वजन करतात, तसें वजीरअलीचें वजन त्या बंगल्यांत अगदीं गुप्तपणें चाललें होतें. तें वजनाच्या पारड्यापैकीं वजीरअलीच्या विरुद्धच्या पारड्यांत जीं वर सांगितलेलीं वजनें पडलीं होतीं, त्यांनाच फक्त माहित होतें. ज्याचें वजन तेथें चाललें होतें, त्याला मात्र हें माहित नव्हतें. ज्याचें वजन करावयाचें तो तेथें प्रत्यक्ष नसतां, त्याचें वजन फक्त त्याच्या नांवावर होणें, ही तर अजब गोष्ट खरीच. अशा रीतीनें वजन करण्याचा हा कांटा कांहीं एशियाखंडांतील व्यापारी मंडळीच्या कोणत्याही पेढीवर मिळावयाचा नाहीं. तो युरोपांतीलच साहसी व्यापारी मंडळीच्या दुकानांत सांपडावयाचा! तोही सर्व युरोपस्थ व्यापारी मंडळीच्या दुकानीं सांपडेल असें नाहीं हो! हिंदुस्थानांतील राजे रजवाड्यांच्या पूर्व पुण्याईनें ज्यांच्या नशिबीं त्यांची व त्यांच्या प्रांताची तुला करून घेण्याची महापर्वणी

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
काशीची कत्तल! ...... दि. ३/१/०२
नोंद ...... नों. दि. २१/९/१०

आली व ज्यांच्यांत त्यांची तुला करण्याचे त्यांच्या शहाणपणानें सामर्थ्य आलें, त्या व्यापारी मंडळींच्या दुकानींच हा अजब काटा सांपडतो. बाकी दुसऱ्या व्यापारी मंडळींच्या काट्यांनीं याच्याबरोबर पुष्कळ दिवस स्पर्धा चालविली होती. पण त्यापैकीं एकही अखेरपर्यंत याच्याशीं टक्कर देण्यास टिकला नाहीं. थोड्या फार अवकाशांत या काट्याच्या भारानें त्यांच्या काट्यांचीं पारडीं तुटूनच गेलीं. आह्माला या काट्याबद्दल इतकें आश्चर्य वाटत नाहीं. पण या काट्यानें वजन करणारा या व्यापारी मंडळीचा मुनीम तो स्वतः दुसऱ्या पारड्यांत बसून व त्यांत आपलें सर्व वजन घालून दुसऱ्याचें वजन बरोबर करून सांगतो, याबद्दल मोठें आश्चर्य वाटतें. कारण वजन करणारा काट्याच्या पारड्याच्या बाहेरच असला पाहिजे. काट्याच्या पारड्याला खालीं नुसतें बोट लागलें, तर जर वजनांत फेर पडतो व तसा फेर पाडून नेहमीं व्यापारी मंडळी आपला फायदा करून घेतांना जर आपण रोज पहातों, तर त्या पारड्यांत तो मुनीम स्वतः बसून आपलें सर्व वजन घालतो, तरी दुसऱ्या पारड्याचें वजन त्याला बरोबर कसें समजतें. बरें, अशी स्थिति असून वजन बरोबर होतें, हें मात्र खरें! त्यांत शंका नाहीं. युरोपांतील काट्यांची गोष्टच कांहीं निराळी. त्यांची जी काय अजब शक्ति आहे ती खरोखर अगम्य व अतर्क्य आहे. ती त्यावेळीं तर कोणाला कळलीच नाहीं. पण अद्यापही इकडील किती मोठ्या मंडळींना ती पूर्णपणें कळली आहे हें तितकेंच अगम्य आहे. आह्मांला वाटतें फारच थोड्यांना ही त्यांची अजब शक्ति जाणण्याची परमेश्वरानें बुद्धि दिली असेल. असले काटे युरोपांतीलच व्यापारी मंडळींच्या हातीं आहेत ह्मणून बरें आहे. एशियांतील व्यापारी मंडळी असे काटे हातांत धरून युरोपांत व्यापार धंदा करण्याकरितां गेली असती, तर त्या मंडळींची एशियांत पुनः त्यांच्या अस्तित्वाची देखील वार्ता कानीं आली नसती. अति सुक्ष्म वजन करण्याचा जसा काटा युरोपांत निघाला आहे, तसा इकडील मंडळींचे शब्द तोलण्याचा ही काटा निघाला आहे. पण अद्याप एखाद्या गुप्त ठिकाणीं बसून श्वासोश्वास ही तोलण्याचा काटा तयार करणारा कोणी युरोपांत एखादा अक्कलवाला शोधक यावेळपर्यंत निघाला नाहीं हें भाग्यच ह्मणावयाचें! थोडक्याच दिवसांत तो

ही निघणार नाहीं ह्मणून भविष्य कोणी सांगावें! तिकडील लोकांच्या अकलेच्या खाणींत सर्व कांहीं भरलेलें आहे. पण या सर्व वस्तु युरोपांतल्या थंड हवेंतच उत्पन्न होतात. त्यांना एशियाखंडांतील उष्ण, तर नाहीं, पण समशीतोष्णही हवा सोसत नाहीं. परमेश्वर कृपेनें एशियाच्या प्रकृतीला केव्हां आराम पडेल तो पडो. त्यानें हवा पालट केल्या खेरिज त्याला चैन पडणार नाहीं असें भविष्य एशियांतल्याच कांहीं मनुष्यांनीं नुकतेंच वर्तवून दाखविलें आहे. पहावें पुढें काय होतें तें! सध्यां मात्र आमच्या अकलेचा, स्वत्वाचा, व सर्व कांहीं गोष्टींचा तोल दीड शतकापासून अद्याप पर्यंत चालूच आहे. कालांत फरक झाला ह्मणून इकडच्या मंडळींच्या अकलेच्या वजनांत कोठें फारसा फरक झाला आहे? तो पूर्वीं प्रमाणें आतांही कोठें कोठें जशाचा तसाच असलेला दिसून येत आहे. मग वजीरअली व त्याचें वजन करणारी मंडळी शंभर वर्षापूर्वीं असली काय, आणि सांप्रत असली काय सारखीच! दोघांचेंही वजन गुप्तपणानें चाललेंच आहे. तसेंच वजीरअलीचें त्यावेळीं चाललें होतें. वजीरअली सारख्या चैनी, व ऐष आरामांकडे सहाजिक प्रवृत्ति असणाऱ्या तरुण नवाबानें कांहीं दिवस तरी नीटपणानें वागावयाचें होतें. तें त्याच्या हातून झालें नाहीं. त्यानें आपल्या तारुण्यांतील अनेक व्यसनांनीं त्यांत भर घातली. मग त्याच्या विरुद्ध पक्षाचें पारडें जड होईल नाहीं तर काय होईल. पण जगाचा अनुभव नसलेल्या, व जनानखान्याच्या दिवाणखान्यांतून उठून अयोध्या प्रांताच्या गादीवर एकदम नेऊन बसविलेल्या तरुण नवाबाला या गोष्टी कळणार कशा? आणि जहासुरअली व इलमासअली सारख्या राज्यकारभारांत काळ्याकेसाचे पांढरेकेस झालेल्या, आणि जगाच्या अनुभव भागानें वांकून गेलेल्या वृद्ध मनुष्यांशीं कृष्णकारस्थानांत तो टक्कर देणार कशी! त्याला त्या पैकीं कांहीं एक कळलें नाहीं. तो आपल्याच चैनींत दंग राहिला. त्यामुळें त्याचें वजन तात्काल कमी झालें, व तें त्यानें आपल्या हातानें करून घेतलें. कांहीं दिवस गादीवर बसल्यावर सरळमार्गानें चालून आपलें स्थान स्थीर करून घेणें हें तो अयोध्येचा नवाब झाल्यानें त्याचें पहिलें कर्तव्य होतें! चैन, ऐष आराम, व व्यसनें या गोष्टी मागन! पण त्याच्या कारकीर्दींत

अगदीं थोड्या अवकाशांत जें पहिलें तें शेवटचें, व शेवटचें तें पहिलें कर्तव्य कर्म झालें. त्याला जो दोष द्यावयाचा तो एवढ्याच गोष्टींत! बाकी अशा रीतीची वर्तणूक फक्त त्याची एकट्याचीच होती, असें मात्र नाहीं. दुसरीही पुष्कळ मंडळी त्याच्या पंक्तितली होती. त्यापैकीं वजीरअल्ली हा एक होता झालें.

जहासीरअल्ली, इलमासअल्ली, लखनौ येथील छोटे मुनीम या सर्वांच्या वजनांनीं वजीरअल्लीचें पारडें खरोखर फार हलकें होऊन गेलें. तेव्हां एवढी मोठी चूक वजनांत कायमची राहूं देणें बरें नव्हे. ती मोठ्या अधिकाऱ्याच्या दृष्टीस आणून देणें आपलें कर्तव्य समजून लखनौच्या मुनिमानें तो काटा तसाच कलकत्त्यास सरजॉनशोअर साहेबापुढें नेऊन ठेवला. त्याची यावेळची व त्यांनीं स्वतः कांहीं दिवसापूर्वी वजीरअल्लीचें व सादतअल्लीचें वजन केलेल्या काट्याची त्यावेळची, अशी विषम स्थिति पाहून सरजॉनशोअर आश्चर्य चकित झाले. त्यांना आपली अशी कशी चूक झाली याबद्दल खरोखर मोठें गूढ पडलें आणि तें उकलण्याकरितां तेथील मुनिमाच्या सूचनेप्रमाणें ते तावडतोब आपल्या मोठ्या थाटमाटासह आणि बंदोबस्ताच्या साधनांसह लखनौ येथें येऊन दाखल झाले. त्यांच्याबरोबर त्यावेळीं सर आल्युअर्ड * क्लार्क नांवाचे एक सेनापती आपल्या सैन्यासह होते. सरजॉनशोअर तेथें येऊन पोहचल्याबरोबर जहासीरअल्ली आणि इलमासअल्ली यांनीं लखनौ येथील रेसीडन्टाच्या मार्फत त्यांची प्रथम भेट घेतली आणि वजीरअल्लीचें त्यांनीं पूर्वी केलेलें वजन आणि त्याची पात्रता जेणेंकरून हलकी होईल तितक्या गोष्टी त्याच्या विरुद्ध सांगून त्यांची चूक त्यांच्या नजरेस आणण्याचा प्रयत्न केला. ज्यांच्या शिरावर कोट्यवधि मनुष्य प्राणांच्या सुखदुःखाची, जिविताची, हिताहिताची व त्यांचें सर्व कांहीं बरें वाईट करण्याची जबाबदारी असते, अशा श्रेष्ठ पुरुषाचें मन

---

* हे कॅापटन क्लार्क साहेब फार सुंदर होते. ते इंग्लडांत असतांना त्यांच्यावर राजघराण्यांतील एका तरुण कन्येचें अत्यंत मन बसलें होतें. तें इतकें कीं, त्यामुळें तिसऱ्या जार्ज राजे साहेबांनीं त्यांना इंग्लंडांत न ठेवतां हिंदुस्थानांत नोकरीवर पाठवून दिलें; असें ह्मणतात.

अनेक कारणांमुळें तत्काळ विव्हळ होऊन जाण्यासारखें जसें हलकें झालेलें असतें, तसेंच ज्या इंद्रियामुळें त्या मनावर वाटेल तसा आणि वाटेल तेव्हां अनुकूल व प्रतिकूळ ठसा उमटतो, तें त्यांचें श्रवणेंद्रियही तसेंच हलकें झालेलें असतें. मन आणि श्रवणेंद्रिय हीं भारानें हलकीं झालेलीं असलीं ह्मणजे मग एकटें डोकें तरी भारदस्त कसें राहणार! त्यानें एकट्यानें ओझें तरी मग कसें सहन करावें? मन, श्रवणेंद्रिय, हीं त्याची सहाय्यकारी मंडळी जर तो सर्व भार सहन करण्यास व त्याला यथाशक्ति मदत देण्यास तयार असतील तर तें सर्व भार वाहण्याला समर्थ होतें. नाहीं तर तेंही मग आपल्यावरचें जबाबदारीचें ओझें फेंकून देऊन आपल्या साथीदारांप्रमाणें हलकें होण्याला प्रवृत्त होतें. तेव्हां सरजॉनशोअर साहेबांच्या मनाची, श्रवणेंद्रियाची व डोक्याची तशी स्थिति असल्यास नवल काय! त्यांचें श्रवणेंद्रिय अनेक प्रकारच्या भानगडीच्या कामामुळें तसेंच झालें होतें. त्याच्याद्वारें वजीरअलीच्या विरुद्ध पक्षाच्या मंडळींनीं त्यांच्या हलक्या झालेल्या मनावर त्यावेळीं सादतअलीला अनुकूळ व वजीरअलीला प्रतिकूळ असा दुसरा ठसा तावडतोब उठविला. मोठी जबाबदारी धारण करणाऱ्या अशा मोठ्या श्रेष्ठाचें मन तें तें पांढऱ्या किंवा काळ्या रंगाच्या संगमवरी दगडाप्रमाणें गुळगुळीत, मृदु आणि नाजूक होतें. एखादें नवीन कांहीं चित्र खोदावयाचें असल्यास, लोखंडाच्या मोठ्या टाकीची व हातोडीच्या आघातांची काळ्या कुळकुळीत दगडाला जशी जरूरी लागते, तशी त्याला लागत नाहीं. लहानशा शस्त्रानें व हलक्या आघातानें त्याच्यावर फारच चांगलें सुबक चित्र खोदतां येतें. त्या कुशल कारागिरांची तो दुसरा ठसा सरजॉनशोअर साहेबांच्या नाजूक आणि मृदु मनावर उठविण्याची इतकी चतुराई होती कीं त्यांनीं जेव्हां हा ठसा उमटाविला तेव्हां तेथें पहिल्या ठशाचा मागमूस सुद्धां राहूं दिला नाहीं. उत्तम कारागिराला उत्तम साधनें किंवा उपकरणीं मिळालीं ह्मणजे तो आपली कारागिरीही मग तशीच दाखवितो. त्यांच्या मनावर वजीरअलीचें चित्र त्यांनीं इतकें भीषण व भेसूर उठविलें कीं, सरजॉनशोअर साहेबाला तो वजीरअली तरूण नबाब जसा श्रीकृष्ण बाल व सुंदर असतांही कंसाला क्रूर दिसूं लागला होता

तसा थोडक्याच अवकाशांत दिसूं लागून त्याच्या भयानें त्यांनीं आपलें तेथील ठाणें तात्काल उठवून रेसीडन्सीपासून पांच मैल दूर राजोद्यान होतें तेथें नेलें. साहेब बहादुराला त्यांच्या जिवाचीच भीति घातल्यावर त्यांनीं आपल्याकडून मग इतका सावधपणा न राखणें हें त्यांच्या शिल्लाला व इभ्रतीला योग्य दिसलें नसतें. वजीरअल्लीला हा काय प्रकार चालला होता तें मुळींच माहित नव्हतें. तो बिचारा तरूण नवाब आपल्या घरीं आलेल्या पाहुण्याचें आदरातिथ्य करण्याकरितां व त्याचें कांहीं कमी पडूं नये एवढ्याकरितां राजधानींतील आपला राजमहाल सोडून देऊन त्यांच्या शेजारीं वसनगृह उभारून तेथें जाऊन राहिला. यापेक्षां त्यानें जास्त काय करावयाचें होतें! परंतु त्यानें अंतःकरणापासून केलेल्या आदरातिथ्याकडे व पाहुणचाराकडे त्याच्या घरीं चालून आलेल्या या मोठ्या पाहुण्यानें लक्ष दिलें नाहीं मग त्याचा स्वीकार करून आभार मानण्याची गोष्ट कशाला पाहिजे! दूषित तापानें अस्वस्थ झालेल्या मनुष्याची जशी स्थिति होते, त्याला सर्व प्रकार मग विषाप्रमाणें कडू वाटून, त्याला सुख व समाधान व्हावें ह्मणून अंतःकरणापासून त्याची मंडळी करीत असलेले उपचार त्याला जसे ते मग प्राणघातक असे वाटतात, तशीच स्थिति सरजॉनशोअर साहेबाच्या मनाची झाली होती. त्यांना वजीरअल्लीचें सर्व पाहुणचार प्राणघातक उपचारासारखे वाटूं लागले. दूषित ज्वरानें जशी शरीराची विकल स्थिति होते, तशीच श्रवणेंद्रिय दूषित झाल्यामुळें मनाची स्थिति होते. हा सर्व साधारण नियम आहे. त्याला साहेब बहादूर अपवाद कसे होणार! त्यांतून ते मोठे व मोठमोठीं जबाबदारीचीं कामें करणारे होते. त्यांचें नाजूक श्रवणेंद्रिय दूषित झाल्यामुळें त्यांच्या मनाला ज्वरता येऊन त्याला विकलता आली यांत त्यांचा तरी काय दोष आहे? त्यांना वजीरअल्लीचें लांबून दर्शन घेणें देखील मोठें भयावह वाटूं लागलें. मग त्याच्याबरोबर दोन सुखदुःखाच्या गोष्टी बोलणें कोठून होणार? त्या गोष्टी मग अर्थातच बंद झाल्या. बरें, वजीरअल्लीचें नशिब तरी जोरावर असावयाचें होतें. तेंही त्यावेळीं प्रतिकूळ झालें. सरजॉनशोअर साहेबांचें मन व शरिर दुसऱ्यानें संतप्त केलें होतें, पण या हतभागी नवाबाला तेथें खरोखरीच ज्वर भरून त्याचें शरीर तप्त झालें.

मग अर्थातच त्याचाही निरुपाय झाला. जी वेळ एकाला कुवेळ असते, ती दुसऱ्याला सुवेळ होते. त्याप्रमाणें हा वजीरअलीच्या शरिराचा आणि सरजॉनशोअर साहेबाच्या मनाचा आजारीपणा दुसऱ्या पक्षाच्या मोठा पथ्यावर पडला. ही आणखी त्यांच्या सुदैवानें आणि वजीरअलीच्या दुर्दैवानें आलेली सोन्यासारखी संधि त्या पक्षाच्या मंडळींनीं फुकट घालविली नाहीं. एकच औषध पण निरनिराळें अनुपान बदलून दिल्यानें तें जसें निरनिराळ्या रोगांवर चालून आपला बरा वाईट गुण दाखवितें, तसें विरुद्ध पक्षाच्या मंडळींनीं येथें केलें. सरजॉनशोअर साहेबाच्या मनाला ज्या मात्रेनें अस्वस्थता आणिली होती, त्या मात्रेचे आणखी दोन वळसे जास्त उगाळून त्यांनीं ती त्यांना पुनः दिली. त्यायोगानें त्यांचा ज्वर जास्त भडकला. ती मात्रा दुसरी कोणची नसून वजीरअलीच्या अनौरसपणाबद्दलची होती. ती देतांना त्या मंडळींनीं इतकी दक्षता ठेविली होती कीं, ती पोंहचल्यावर तिचा अंमल केव्हांही उतरूंच नये; आणि तशा स्थितींत त्यांनीं आपल्या ह्मणण्याप्रमाणें सर्व गोष्टी कराव्या! अंमल चढलेला मनुष्य जसा मग तो स्वतःच्या स्वाधीन न राहतां त्या अंमलाच्या स्वाधीन होतो आणि तो ज्या कृति करवील त्या करूं लागतो, तसा मग शोअर साहेबांचा प्रकार झाला. त्यांना मंडळींनीं दिलेल्या मात्रेच्या अंमलामुळें वजीरअलीमध्यें बाहेरख्यालीपणा, उधळेपणा व हुच्चेपणा हे जे अवगुण आहेत, ते त्याला संगतीनें लागलेले नसून, ते त्याच्या जननीच्याच अंगीं असलेल्या बीजांचे अंकूर होत, असें दिसूं लागलें. मग त्याच्या अनौरसपणाबद्दल त्यांना मुळींच शंका राहिली नाहीं. त्या थोर गृहस्थाला मग वजीरअलीला गादीवर बसविल्याबद्दल अत्यंत वाईट वाटलें व आपल्या हातून फार मोठी चूक झाली याबद्दल त्यांना अत्यंत पश्चात्ताप झाला. आपल्या हातून चूक झाली असल्यास, ती दृष्टीस आल्यावर प्रांजळपणें कबूल करणें आणि सुधारणें हें मोठ्या माणसाच्या मोठ्या मनाचें मोठें लक्षण आहे. मग तें करण्यांत कोणाचें कितीही नुकसान झालें तरी त्याची पर्वा नाहीं. वजीरअलीला प्रथम अयोध्येच्या गादीवर बसविण्यांत आपल्या हातून चूक झाली, एवढी त्यांच्या मनाची खात्री त्या मंडळींनीं करून दिल्याबरोबर आणि त्यांना-

ही ती पटल्याबरोबर, ते थोर सरजॉनशोअर साहेब ती आपली चूक सुधारण्यास तयार झाले. नबाबाची गादी वजीरअल्लीसारख्या अनौरस पुरुषाच्या स्पर्शानें जी एकदां विटाळली ती विटाळली. आतां पुनः मात्र त्याला तिचा स्पर्श होऊं द्यायचा नाहीं. असा मग त्यांनीं दृढ निश्चय केला. कारण त्याच्या-योगानें व्यापारी मंडळीच्या व गादीच्या इभ्रतीला कायमचा धक्का बसेल. त्यांचा वजीरअल्लीसंबंधानें असा निश्चय झाल्यावर रिकाम्या झालेल्या गादीवर कोणास बसवावें हाही प्रश्न मग त्यांच्यासमोर उभा राहिला. कारण अयोध्येचें सिंहासन रिकामें टाकणें हेंही बरें नव्हे. नांवाला कां होईना पण कोणाला तरी गादीवर बसविलें हें पाहिजेच होतें. वजीरअल्लीच्या अनौरसपणाबद्दल खात्री झाल्यावर तो अयोध्येच्या गादीला स्पर्श करण्याला अपात्र ठरला. त्याची किंमत; वजन, सर्व कांहीं मग लागलेंच उतरून त्याचें पारडें हलकें झालें. तेव्हां अर्थातच त्याचा प्रतिस्पर्धी जो सादतअल्ली त्याचें पारडें जड होऊं लागलें. तो असफउद्दवल्याचा सख्खा भाऊ असल्यानें त्याच्या शीलाबद्दल शंका येण्याचें मुळींच कारण नव्हतें. त्याची पात्रता ठरण्याला एवढें वजन प्रथम पुरें होतें. पण ज्या सादतअल्लीच्या पक्षाकडील मंडळींनीं त्याच्याकरितां एवढा उपद्व्याप केला व व्यापारी मंडळीला त्यांचा अमोल वेळ खर्च करून त्याची योग्यता ठरविण्याकरितां हें पुनः दुबार काम करावयास लावलें, त्याबद्दल व्यापारी मंडळीला काय नफा होणार? याचा विचार करणें मग सहाजिकच ओघाला आलें. गुडघ्याइतक्या उंच व मऊ रुजाम्यावर जनानखान्यांतील दिवाणखान्यांत लोळणाऱ्या व नेहमीं ऐषारामांत दंग असणाऱ्या, तरूण असो अथवा वयातीत असो, अशा राजाचा; नबाबाचा व बादशहाचा काल जात नाहीं, म्हणून कसा तरी तो घालविणाऱ्या या राजमंडळींच्या काळापेक्षां व्यापारी मंडळीचा एक दिवस, एक तास व एक क्षणसुद्धां बहुमोलाचा असतो. कारण राजे लोकांना प्रत्येक क्षणाला आयुष्य व द्रव्य हें घालवावयाचें असतें आणि व्यापारी मंडळींना तें मिळवावयाचें व तसेंच वाढवावयाचें असतें. याकरितां त्याचा मोबदला त्यांना कांहीं तरी हा मिळालाच पाहिजे. मग तो कोट्यवधि रुपयापासून एक कपर्दिकेपर्यंत मिळाला तरी हर-

कत नाहीं. दोहोंतही त्यांचा संतोषच असतो. तेव्हां व्यापारी मंडळीच्या या बाबतीसंबंधानें सादतअलीच्या पक्षांतील मंडळीशीं बोलणें सुरू झालें. व्यापारी लोकांचें घेण्याचें वजन निराळें, त्यांनी सौदा ठरण्याची सांकेतिक भाषा निराळी, गिऱ्हाइकाशीं बोलण्याची भाषा निराळी, कृति निराळी, त्याचप्रमाणें त्यांची चलाखी, चतुराई, सावधगिरी वगैरे सर्व कांहीं गोष्टी निराळ्या. वगै. या सर्व गोष्टी अगदीं उघड समोर पदराखालीं हात घालून राजरोसपणानें जरी चालत असल्या तरी तिसऱ्याला त्यापैकीं एक अक्षर कळेल तर शपत! त्यांचें जग व रहाटी निराळीच असते. त्यांच्या आपसांतील चाललेल्या कृतीवरून आणि सांकेतिक भाषेवरून जर कोणी तिसरा तें चाललेलें सर्वच खरें मानून त्याप्रमाणें वागेल तर तो आपल्या पदरांतील द्रव्याची गांठोडी त्यांच्या पदरांत आपण होऊन घालून रिकामा हात हालवीत आल्याखेरीज आणि द्रव्याबद्दल आपल्या मूर्खपणाची गांठोडी मात्र पदरीं बांधून घेऊन आल्याखेरीज राहणार नाहीं. व्यापारी लोकांचा सौदा भर बाजारांत उघडपणें चाललेला असून जसा तो तिसऱ्याला गुप्तच असतो, तसाच प्रकार सादतअलीच्या पक्षाकडून या व्यापारांत व्यापारी मंडळीला फायदा काय होणार याबद्दल उघड, पण गुप्ततेनें विचार चाललेला होता. त्यापैकीं एक अक्षर देखील वजीरअलीला व त्याच्या पक्षापैकीं एकाही इसमाला जो अगदीं सरजॉनशोअर साहेबाच्या बंगल्याशीं तंबू ठोकून राहिला होता तरी कळलें नाहीं. सांकेतिक भाषेंत उभय पक्षाची बरीच शाब्दिक वाटाघाट होऊन, मग हात चलाखी होऊन शेवटीं एकदांचा सौदा पटला, व उभयतांनीं एकमेकाच्या हातावर हात मारला. झालें. लागलेंच इकडचें पारडें तिकडे फिरलें. आतां सादतअलीचें पारडें इतकें जड झालें कीं तें जमिनीला टेकलें आणि वजीरअलीचें पारडें अस्मानाला पोंहचलें. केवढें हें पूर्वीच्या आणि आतांच्या तोलांत अंतर? आणि केवढी ही चूक! जसें व्यापारी मंडळीचें पारडें फिरलें, त्याबरोबर वजीरअलीचें आणि सादतअलीचें नशिबही फिरलें. त्यामुळें त्यांचीं स्थानेंही फिरलीं. तरूण नवाब वजीरअली याच्याजवळ जसें थोडें बहुत अवगुणांचें भांडार होतें, तसें सादतअलीजवळ नव्हतें, असें मात्र नाहीं. तो त्याच्यापेक्षां वयानें जरी मोठा

होता तरी त्यानेंही गंगेच्या काठीं बसून त्या भांडारांत पहिल्यापासून थोड-थोडी भर टाकली होती. भीरूपणा, कृपणता, अत्यंत मदिरापानासक्तता, अशीं कांहीं खेलकीं शेलकीं रत्नें त्याच्या भांडारांत होतीं. पण याशिवाय त्याच्या अधिकारांत कोणी ढवळाढवळ केली असता ती न खपणें, आणि त्याच्यासंबंधानें विलक्षण नेट व हट्ट धरणें वगैरे गुणांचा त्याच्याजवळ पुष्कळ सांठा होता. यामुळें तो अधिकार चालविण्याला अपात्र असा नव्हता. यथेच्छ मदिरापान करणें आणि राज्याधिकार चालविणें या गोष्टी अगदीं भिन्न आहेत. त्या एकमेकाच्या आड केव्हांच येत नाहींत. त्याच्यासंबंधानें विशेष विचार कर-ण्याचें कांहीं कारण नाहीं असें मंडळींनीं ठरवून त्याला अयोध्येच्या गादीवर आणून बसविण्याचें ठरविलें. ही बातमी सादतअलीला कळल्याबरोबर तो हर्षानें वेडा झाला. वर्षास सव्वा लक्ष रुपयांची नेमणूक घेऊन गंगेच्या कांठीं मधुबागेंत काळ काढणाऱ्या सादतअलीला जर आतां अयोध्येची गादी मिळ-ण्याचा प्रसंग आला तर तो हर्षानें वेडा कसा होणार नाहीं? त्याला ती केवळ स्वप्नसृष्टिच वाटूं लागली. पण वास्तविक ती स्वप्नसृष्टि नव्हती. त्याच्या प-क्षाच्या मंडळींच्या अत्यंत खटपटीनें, त्यांनीं त्याच्याकरितां टाकलेल्या वज-नानें आणि व्यापारी मंडळीच्या मुनिमाच्या कृपाप्रसादानें राजैश्वर्याच्या भव्य प्रासादावर चढण्याला योग्य ठरून, त्याची एकेक पायरी तो चढूंही लागला. हा जो सादतअलीला अयोध्येचें राज्यपद मिळवून देण्याचा सौदा ठरला, त्याच्या मेहनतीबद्दल व्यापारी मंडळीला काय द्यावयाचें हें फक्त दोघांनाच माहित होतें. तें आह्मालाही माहित आहे. तें गुप्त असून जर अद्यापपर्यंत सादतअलीलाही फारसें कळलें नाहीं, तर त्या रहस्याचा आह्मीही इतक्यांत स्फोट करीत नाहीं. फक्त इतकेंच वाचकांनीं लक्षांत ठेवावें कीं, सादतअलीच्या पक्षाच्या मंडळींनीं व्यापारी मंडळीना त्या या मेहनतीबद्दल अथवा दलालीबद्दल ह्मणा जें कांहीं देण्याचें ठरविलें होतें, तें अयोध्या प्रांताच्या तिजोरीला इतकें जड आणि व-जनदार होतें कीं, केवळ त्याच्या वजनाच्या भारानेंच सादतअलीचें पारडें जड होऊन खालीं बसलें होतें. त्याच्यासंबंधानें सादतअलीच्या मुनिमांत आणि कलकत्त्याच्या व्यापारी मंडळीच्या मुनिमांत वाटाघाट होऊन लखनौ येथें सौदा

पटल्याबरोबर, सरजॉनशोअर साहेबांनीं त्यांचा काशी येथील मुनीम मि. चेरी यांस सादतअल्लीला काशीहून बरोबर घेऊन येण्यास तावडतोब लिहिलें. नवीन व आतां थोर झालेल्या सादतअल्लीला आणण्याकरितां सरजॉनशोअर थोर गृहस्थ स्वतः काशीस गेले असते, पण त्यांना लखनौ येथें दोन तीन महत्वाचीं कामें करावयाचीं होतीं, ह्मणून तसें करतां आलें नाहीं. यामुळें तें काम त्यांना आपल्या हाताखालच्या अंमलदाराकडेच सोंपवावें लागलें. सादतअल्ली लखनौ येथें येऊन दाखल होतांच त्याला सामोरें जाऊन समारंभानें मिरवित आणण्याचें मुख्य तेवढें काम त्यांनीं निरुपायानें आपल्याकडे ठेविलें. वजीरअल्लीला अयोध्येच्या गादीवरून उतरून ती सादतअल्लीकरितां रिकामी करणें, शिवाय त्याच्या राज्यारोहण समारंभाची मोठी टोलेजंग तयारी करणें, त्याचप्रमाणें वजीरअल्लीला एखादें राहण्यासारखें आरामस्थान शोधून काढणें व तेथें त्याला पाठवून देण्यासंबंधानें योग्य तो बंदोबस्त करणें, या अत्यंत महत्वाच्या गोष्टी सरजॉनशोअर साहेबाला लखनौ येथें राहून करावयाच्या होत्या, ह्मणून ते स्वतः तेथें राहिले होते. वजीरअल्लीला राहण्याला कोणचें ठिकाण ठरवावें याबद्दल सरजॉनशोअर साहेबाना फारसा विचार करावा लागला नाहीं. कारण सादतअल्लीला वजीरअल्लीच्या जागेवर आणण्याचें ठरल्याबरोबर त्याची रिकामी झालेली जागा मग अर्थातच वजीरअल्लीला देण्याचें ठरलें. या कृत्यांत वावगें कांहीं झालें नाहीं. सरजॉनशोअर साहेबांनीं फक्त दोघांची इकडची तिकडे आणि तिकडची इकडे एवढीच काय ती अदलाबदल केली. इंग्लिश व्यापारी मंडळीचें पारडें आणि त्याबरोबर दोघांचीं नशिबेंही फिरल्यानंतर दोघांचीं स्थानेंही फिरलीं यांत विशेष कांहीं झालें नाहीं. सादतअल्लीला काशीहून आणून लखनौस अयोध्येच्या गादीवर बसविल्याबरोबर वजीरअल्लीला तूर्त काशीस सादतअल्लीच्या रिकाम्या झालेल्या जागेंत ठेवण्याचें ठरविलें आणि त्याप्रमाणें त्यांनीं त्याला तिकडे बंदोबस्तानें पाठविण्याचीही लागलेंच तजवीज केली. सादतअल्ली, चेरी साहेब व त्यांच्या बरोबरची फौज यांच्यासह कानपुराहून लखनौस येऊन दाखल झाल्याबरोबर सरजॉनशोअर साहेब त्याला स्वतः सामोरे गेले. त्यांनीं त्याला आपल्या स्वतःच्या शृंगारलेल्या हत्तीवर

बसविलें आणि मोठ्या समारंभानें वाजत गाजत राजमहालांत आणून वजीर-अल्लीला त्याच्या स्थानापासून ढकलून दिल्यानें रिकाम्या झालेल्या गादीवर अयोध्येचा खरा हक्कदार नबाब म्हणून बसवून त्याच्या नांवाची द्वाही फिरविली व त्याच्यावर आहल्या हातानें छत्र चामरें ढाळलीं. त्यावेळीं लखनौ शहराबाहेर ज्याठिकाणीं वजीरअल्ली तंबूंत त्याच्या घरीं या चालून आलेल्या पाहुण्याचा पाहुणचार करण्याकरितां येऊन राहिला होता, तेथून त्यानें तंबूच्या बाहेर साहेब बहादुरांना विचारल्याखेरीज पडूं नये व त्याला आधींच भरलेला ज्वर हा राज्यारोहणाचा वाद्यघोष त्याच्या कानीं पडून तो जास्त भडकूं नये एवढ्याकरितां आणि त्याच्या प्रकृतीच्या स्वास्थ्याकरितां त्यांनींही इतकी खबरदारी पहिल्यापासून घेतली. सादतअल्लीच्यासभोंवतीं जसा व्यापारी मंडळीच्या फौजेचा गराडा होता, तसाच वजीरअल्लीच्याही तंबूसभोंवतीं त्याच सैन्याचा वेढा पडला होता. सादतअल्लीचा हा अकस्मात झालेला राज्यारोहण समारंभ सर्वांनाच एकसारखा आनंद देणारा नव्हता. वजीरअल्लीच्या मनाप्रमाणें त्याच्या पक्षाच्या बऱ्याचशा मंडळींचीं मनें संतप्त करून सोडणारा होता. तेव्हां अशा कांहीं संतप्त झालेल्या मनांना थंडगार करून सोडणारी धनधारा याखेरीज दुसरी कोणची अमृतधारा उपयोगी पडणार ! अमृतधारा ही निर्जीवाला सजीव करते, पण ही धनधारा सजीवाला अगदीं निर्जीव करून टाकते. मग नुसती लक्ष्मीसम चंचल असणारी आणि क्षणांत तप्त व क्षणांत थंडगार होणारीं लोकांचीं मनें या धनधारा वर्षावानें अगदीं थंडगार, निर्जीव व जमिनदोस्त करून टाकलीं असल्यास नवल काय ! सादतअल्ली जेव्हां हत्तीवर बसून लखनौच्या राजवाड्यांत आला, तेव्हां त्यानें आपल्या दोन हातांनीं दोहों बाजूच्या लोकांवर एकसारखी धनधारेची वृष्टि केली. त्यामुळें जिकडे तिकडे अगदीं गारीगार होऊन गेलें. याप्रमाणें सरजॉनशोअर या थोर गृहस्थाच्या अजब कर्तबगारीनें वजीरअल्ली हा नुकता गादीवर बसलेला नबाबपदापासून च्युत होऊन सादतअल्ली हा त्या पदावर अधिष्ठित झाला. एवढें हें महत्कृत्य रक्ताचा एक थेंबही न पडतां ज्या सत्पुरुषाच्या लेखणीच्या एका फटकाऱ्याबरोबर तें निर्विघ्नपणें पार पडलें, त्या पुरुषाची चतुराई व त्याच्या लेखणीची अचाट शक्ति

यांची खरोखर जितकी तारीफ करावी तितकी थोडीच आहे. युरोपांत असला प्रकार इतक्या शांतपणानें केव्हांच झाला नसता. तेथें जमिनीची किंमत नुसत्या रुपयानें होत नाहीं. एशियांतील उष्ण प्रदेशांत असले प्रकार अशा शीतोपचारांनींच करावे लागतात. राज्यारोहणाचें काम संपल्यावर तो समारंभ पाहण्यास आलेल्या चेरी साहेबाबरोबर वजीरअल्लीची मोठ्या बंदोबस्तानें काशीस सरजॉनशोअरनीं रवानगी करून दिली. लखनौ येथें आणखी कांहीं महत्वाच्या कामाचा निकाल नवीन नबाबाकडून करून घेण्याकरितां त्यांनाही कलकत्त्यास जाण्याची त्वरा होती; पण निरुपायानें मागें रहावें लागलें. सादतअल्ली हा आतां अयोध्येचा नबाब झाला आणि वजीरअल्ली हा काशी येथें सादतअल्लीप्रमाणें गंगातीरीं तीर्थवास करीत राहिला. एवढें हें महत्कृत्य आपण कशा शिताफीनें पार पाडलें याबद्दलची साग्र हकीकत आपल्या लंडन येथील लेडन हाल स्ट्रीट मधल्या दिवाणखान्यांत बसून निरनिराळ्या प्रकारच्या व्यापारांत दररोज किंवा दर क्षणाला व्यापारी मंडळीला किती फायदा झाला, हें पाहणारी जी मुख्य व्यापारी मंडळी तिच्या अधिकाऱ्यांना लिहून कळविण्याकरितां हे मोठ्या थोर मनाचे, उदार, शांत स्वभावाचे, राजाचा रंक आणि रंकाचा राव करणारे प्रतिविधाता किंवा प्रतिविश्वामित्र असे साहेब बहादूर मग आपल्या कलमानें पांढऱ्या कागदावर काळ्या शाईनें रंग देण्याच्या कामास लागले. साहेब बहादूर त्याही कामांत मोठे चतुर होते. त्यांनीं तेंही काम एका बैठकींतच उरकून टाकलें. हा पुनः एवढा उपद्व्याप आपण कां केला याबद्दल पुष्कळ कागद रंगविण्याची खटपट त्यांनीं मुळींच केली नाहीं. फक्त त्यांनीं दोन तीनच मुख्य मुद्यांच्या गोष्टी लिहिल्या. पहिली गोष्ट ही कीं, वजीरअल्लीकडून जी दरसाल पंचावन लक्ष रुपयाची रक्कम मंडळीस मिळण्याचा ठराव होता, तिच्यापेक्षां वीस लक्ष रुपये जास्त आतां सादतअल्लीकडून मिळण्याचा ठराव करून घेतला. म्हणजे आतां मंडळीला त्यांच्या फौजेच्या वगैरे खर्चाबद्दल अयोध्येच्या या नवीन नबाबाकडून दर वर्षास पाऊण कोट रुपये मिळण्याचा ठराव झाला. दुसऱ्या युरोपियन लोकांशीं पत्रव्यवहार व हरएक गोष्टीसंबंधानें बोलाचाली करण्याचा जो स्वतंत्रपणें पूर्वापार हक्क त्यांना पूर्व-

जांपासून होता त्या पुरातन हक्कावर पाणी सोडण्याचें आणि इतक्या स्वतंत्रपणानें न वागण्याचें सादतअल्लीनें कबूल केलें. दुसऱ्या कोणत्याही युरोपियन लोकांना आपल्या चाकरींत न ठेवण्याचें ठरविलें. या दोन तीन पुरातन हक्कांवर तरूण वजीरअल्ली नबाबानें मात्र पाणी सोडलें नव्हतें. शिवाय राज्यारोहण समारंभाचा जो सुमारें बारा लक्ष रुपये खर्च झाला, तो व्यापारी मंडळीस अयोध्येच्या खजिन्यांतून एकदम देऊन टाकण्याचा हुकूम सोडला. एवढाच काय तो व्यापारी मंडळीला या सौद्यांत फायदा झाला. हे करारमदार जेव्हां सादतअल्लीनें कबूल केले तेव्हांच त्याचें पारडें मुख्यतः जड झालें होतें. याच्याखेरीज दुसऱ्या त्याच्या गुणवजनांनीं त्याला जडत्व कितपत आलें असतें याबद्दल शंकाच आहे. सर्व धातूंमध्यें चांदी आणि सोनें या दोन धातू अत्यंत जड असतात, हें सर्वांना माहित आहे. यांच्यायोगानें वाटेल त्याला जडत्व येतें. मग वजीरअल्लीपेक्षां सादतअल्लीला त्याच्यायोगानें जडत्व आलें असल्यास नवल काय! हे सर्व करारमदार यावेळपर्यंत गुप्तच होते. व्यापारी रीतीप्रमाणें ते जेव्हां उभय पक्षांनीं गुप्त ठेवले होते, तेव्हां आम्हीही योग्य प्रसंगाशिवाय त्याचा स्फोट करणें बरें नव्हे ह्मणून तो यावेळपर्यंत केला नव्हता. आतां सर्व सौदा पटून जिकडे तिकडे स्वस्थता झाल्यावर तसें गुप्त ठेवण्याचें कारणच उरलें नाहीं. याच काय त्या व्यापारी मंडळीच्या फायद्याच्या मुख्य गोष्टी होत्या. त्या मुख्य अधिकारी मंडळींस कळविण्याचें काम करून व रोकड पदरांत पाडून घेऊन नव्या व जुन्या नबाबाला त्यांच्या त्यांच्या ठिकाणीं पोंहचवून सरजॉनशोअर साहेब विश्रांति घेण्याकरितां कलकत्त्यास निघून गेले. हा सौदा जो व्यापारी मंडळीकरितां सरजॉनशोअर साहेबांनीं केला तो हीं दोन गिन्हाईकें त्यांच्याकडे आलीं होतीं, ह्मणून केला. पण या सौद्यामुळें सादतअल्ली आणि वजीरअल्ली हे मात्र खरे वेडे झाले. सादतअल्ली जो गंगेच्या काठीं सव्वा लक्ष रुपयांची नेमणूक घेऊन फार वर्षे तपश्चर्या करीत बसला होता, त्याला अयोध्येची गादी अकस्मात मिळाल्यामुळें तो हर्षानें वेडा झाला आणि वजीरअल्ली हा राजाचा रंक झाल्यामुळें संतापानें वेडा झाला. एकंदरींत दोघेही वेडे बनले. राज्यपद मिळाल्यामुळें त्याच्याकरितां आपण स्वतः वडिलोपा-

र्जित व पुरातन असे हक्क गमविले कोणचे, त्याचा परिणाम पुढें काय होणार, हें त्या हर्षानें वेडा झालेल्या सादतअलीला समजलें नाहीं, आणि आपण भलतें सलतें केल्यास आपली जी योग्यता आहे, ती आणखीही कमी होईल किंवा आणखी आपली काय दुर्दशा होईल हें त्या तरूण, अननुभवी व अज्ञ, वेड्या पीर वजीरअलीला कळलें नाहीं. कोणत्याही सौद्यांत राज्यलाभासारखा मोठा फायदा होवो अथवा तसाच तोटा होवो, समुद्राप्रमाणें ज्याचें मन शांत, गंभीर आणि नाजूक व कठोर या अथवा दुसऱ्या कोणत्याही विकारापासून अलिप्त रहातें, तेंच खरें शहाणे, धूर्त व गंभीर. अशी विकाररहित थोर मनाची मंडळी ही वणिज वर्गांतच सांपडते. मग ती जगांतील कोणत्याही भागांतील असो. वणिज वर्गाचीं मनें परमेश्वर अशाच प्रकारचीं बनवितो. तेव्हां हर्षानें वेडा झालेला सादतअली जोंपर्यंत त्याच्या खजिन्यांत त्याला वाटेल त्याला देण्याला व वाटेल तसें उधळण्याला विपुल द्रव्य होतें, तोंपर्यंत तो सावध झाला नाहीं. त्याचे वेडेचार चालले होते. तिकडे आपल्याला पाहण्याची विशेष जरूर नाहीं, कारण त्याच्या वेडेचाराला नुकताच कोठें आरंभ झाला आहे. ते परिपक्व दशेला पोंहचण्याला आणि त्याचे परिणाम त्याच्या अनुभवाला येण्याला बराच अवधि पाहिजे. पण दुसरा संतापानें वेडा झालेला पीर वजीरअली यानें काशीला गेल्यावर वर्ष दीड वर्षाच्या आंत जे वेडेचार केले, त्याचे परिणाम त्याला व दुसऱ्या कोणाला कसे भोगावे लागले तें आपणाला प्रथम पाहिलें पाहिजे. कारण कडू काकडीचा वेल जितका लवकर फलद्रूप होतो, तितका द्राक्षाचा वेल होत नाहीं.

'चांगल्या सुशिक्षित अंतःकरणाच्या मनुष्याला एवढा देखील अन्याय झालेला खपत नाहीं. तो तशा मनुष्याच्या अंतःकरणाला कधींही बरी न होणारी अशी जखम करून ठेवतो. त्या अन्यायाच्या जखमेमुळें त्याच्या अंतःकरणाला होणाऱ्या वेदना अत्यंत असह्य असतात,' असें एका ग्रंथकारानें म्हटलें आहे. तें सध्यां वजीरअलीला जी आतां स्थिति प्राप्त झाली तिच्यासंबंधानें बरोबर लागू पडतें. त्याला अयोध्येच्या गादीवरून पदच्युत केल्यामुळें त्याच्या मनाची काय स्थिति झाली असेल, तें दुःख. संताप. अपमानादि

विकारांनीं किती भरून गेलें असेल आणि तो मत्सरविरहित व मोठ्या आनंदानें लखनौहून काशीला गेला असेल असें ह्मणवत नाहीं. त्याला पदच्युत करण्यांत तर एक चूक झालीच, पण सादतअल्लीला ज्या ठिकाणीं पूर्वीं ठेवलें होतें, त्याच ठिकाणीं त्याच मधुदासबागेंत वजीरअल्लीला नेऊन ठेवलें, ही त्यापेक्षां आणखी दुसरी मोठी चूक सरजॉनशोअर साहेबांनीं केली असें स्क्राईन साहेब ह्मणतात. तो पदच्युत झालेला अयोध्येचा तरूण नबाब त्याच्यासंबंधानें सरजॉनशोअर साहेबांनीं मोठा अन्याय केल्यामुळें दुखविलेल्या सर्पाप्रमाणें पण संतापानें वेडा झालेला वजीरअल्ली त्यावेळीं निरुपायामुळें काशीला जाऊन राहिला.

सरजॉनशोअर साहेबांनीं हें काम मोठ्या शिताफीनें, सफाईनें व चतुराईनें शेवटास नेल्याबद्दल ते पुढच्याच वर्षीं इ. स. १७९८ त स्वदेशास परत गेल्यावर व्यापारी मंडळीच्या तेथील मुख्य अधिकाऱ्यांनीं त्यांची चांगली पाठ थोपटली. त्यांच्या पाठीमागून मार्किस ऑफ वेलस्ली साहेब त्यांच्या स्थानीं अधिष्ठित होऊन हिंदुस्थानांतील व्यापारी मंडळीच्या कामाचीं सर्व सूत्रें त्यांच्या हातीं आलीं.

अयोध्येच्या खजिन्यांतून वजीरअल्लीला दरसाल सव्वा लक्ष रुपये नेमणूक मिळूं लागली. त्या नेमणुकींत लहानसें सैन्य, डंका, निशाण, अशा तऱ्हेचा राजाला योग्य असा लवाजमा तो बाळगूं लागला. तो जेव्हां शहरांत किंवा बाहेर फिरावयास निघे, तेव्हां हें सर्व राजेश्वर्य बरोबर घेऊन निघे. एकटा सडा असा तो केव्हांच निघत नसे. अशा राजैश्वर्यांत, थाटमाटांत तो राहूं लागल्यानें त्याचे जे पक्षपाती व अनुयायी होते, ते मग हलकें हलकें त्याच्याजवळ एकामागून एक असे जमूं लागले. कांहीं दिवसानीं त्या मंडळीचें मुख्य स्थान जें लखनौ होतें, तें आतां काशी क्षेत्र झालें. ती मंडळी त्याच्यासभोंवतीं जमल्यावर आणि त्या तरूण नबाबानें आपलें नाजूक श्रवणेंद्रिय साहेब बहादुराप्रमाणें त्यांना सर्वस्वी अर्पण केल्यावर त्या नकिलाद्वारें त्यांनीं त्याच्या अंतःकरणांत गुप्तपणानें धुमसत असलेला क्रोधानळ हलकें हलकें प्रज्वलित करण्याला आरंभ केला. तें काम बरेंचसें झाल्यावर मग मोठीं कारस्थानें, व्यूह वगैरे गोष्टी होऊं लागल्या. त्याच सुमारास लाहोर येथें झेमानशाहा येऊन

तळ देऊन बसलेला होता. त्याच्याशीं वजीरअलीचा पत्रव्यवहार सुरू झाला. झमानशहाचे कलकत्ता व उत्तर हिंदुस्थानांत मुख्य मुख्य ठिकाणीं हुशार गुप्त हेर होते. राजा, जमीदार, सरदार व रंक हे सर्व एकसारखेच समजण्याची व त्यांना तशा रीतीनें वागविण्याची जी व्यापारी मंडळींनीं पद्धत चालू केली होती, तिच्यामुळें पुष्कळ असंतुष्ट झालेले हिंदू व मुसलमान सरदार, जमीदार वगैरे लोक होते, त्यांची आणि झमानशहाच्या हुशार हेरांची चांगली मैत्री जमली होती. त्यांत वजीरअलीच्या पदच्युतीनें चांगलीच भर घातली. त्यामुळें एक मोठा कट व्यापारी मंडळीच्याविरुद्ध तयार झाला. त्यांत काशीचा महाराज नव्हता. पण त्याचे सर्व आप्त सोयरे या कटांत सामील झाले होते. चेतसिंगाची काय दशा झाली होती, हें तो विसरला नव्हता. त्यानें मौन धारण करून स्वस्थ बसणें हा शहाणपणाचा मार्ग यावेळीं स्वीकारला होता. एकदां ठेंच लागून जो सावध होतो, तोही शहाण्यांत गणला जातो. त्यानें या कामांत मुळींच लक्ष घातलें नाहीं.

वजीरअलीच्यासभोंवतीं जी मंडळी जमली होती, त्यांत जगतसिंग ह्मणून एक मनुष्य मुख्य होता. आपण शेख सादीप्रमाणें पर्शियन कवी आहोंत असा त्याला मोठा अभिमान होता. काशी शहर प्रथम हस्तगत करून घेण्यासंबंधानें जो वजीरअलीचा बेत होता, तो सिद्धीस नेण्याला ज्या हजारों मनुष्यांची जरूर होती, तीं हजारों मनुष्यें जमविण्याचें मोठें काम त्यानें आपल्या शिरावर घेतलें. दुसरा त्याच्या खालोखाल भवानीशंकरसिंग ह्मणून एक मोठा श्रीमंत जमीनदार गंगेच्या पलीकडे चुनारच्या बाजूला रहात असे, तो होता. तिसरा शिवनाथ ह्मणून एक मनुष्य होता. त्याचें घर शहरांत असल्यानें तो शहरांत रहात होता. त्याच्याजवळ दांडपट्टा व लठ्ठ खेळणारे असे पुष्कळ हुशार लोक होते. पहिल्या प्रथम या कटांत सुमारें ४००० हजार असंतुष्ट झालेले लोक आणि १०० घोडेस्वार इतकी मंडळी वजीरअलीच्या पक्षाला एकदम येऊन मिळाली होती आणि त्याला पहिल्या धडाक्यांत यश मिळाल्याबरोबर, जवळ जवळ ८०००० लोक मिळतील इतकी जय्यत तयारी झाली होती, असें पुढें डेव्हीस साहेबानें ठरविलें. त्याचें सुमाराला मद्रास

इलाख्यांत टिपू सुलतान आणि इंग्लिश व्यापारी मंडळी यांची लढाई जुंपली होती. तेव्हां उत्तर हिंदुस्थानांतील व्यापारी मंडळीची बरीच मोठी फौज तिकडे पाठविण्याची तजवीज चालली होती. ती सर्व फौज तिकडे रवाना झाली आणि इकडे सर्व मैदान मोकळें सांपडलें ह्मणजे मग बंडाचा बाहुटा उभारण्याचें वजीरअल्लीनें व त्याच्या कटांतील मंडळीनें ठरविलें आणि ते सर्व त्या संधीची वाट पहात स्वस्थ बसले.

काशी येथील सर्व कामकाज व्यापारी मंडळीचे मुनीम मि. चेरी यांच्या हातांत होतें. ते तेथील मुख्य अधिकारी होते असें ह्मणावयास हरकत नाहीं. हे साहेब मोकळ्या मनाचे व धांदल्या आणि एखाद्या गोष्टीचा उगीच मोठा बाऊ करून दाखवावा, अशा स्वभावाचे असून मोठे डौली व रंगेल कामगार होते. हे गुण उपजत त्यांच्या अंगीं वसत होते ह्मणा, किंवा सहवासानें त्यांच्या अंगीं नवीन आले होते असें ह्मणा. पण अठराव्या शतकांतील डौली व रंगेल कामगाराचा मि. चेरी साहेब हे एक नमुनाच होते. त्यांच्या हाताखालीं दुसरें मि. डेव्हीस ह्मणून कामगार होते. ते मोठे हुशार, चलाख व भाषाकोविद असून, त्यांना खगोल विद्येचें चांगलें ज्ञान होतें. यामुळें शहरांतील मोठमोठ्या आणि चांगल्या लोकांच्या व त्यांच्या ओळखी झाल्या होत्या. त्यांच्यायोगानें त्यांना वजीरअल्लीच्या या मोठ्या कारस्थानाची थोडीशीं कुणकुण लागली होती. ती लागल्याबरोबर डेव्हीस साहेब चेरी साहेबाप्रमाणें स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं व्यापारी मंडळीची सत्ता उत्तर हिंदुस्थानांतून नाहींशीं करून टाकण्याच्या वजीरअल्लीच्या कटाची मि. चेरी साहेबास लागलेच बातमी दिली आणि वजीरअल्लीची काशीहून दुसऱ्या कोठें तरी दूर ठिकाणीं उचल बांगडी करावी, असें सांगितलें. जगतसिंग आणि पदच्युत नबाब यांच्यामध्यें जें कारस्थान चाललें होतें, त्याची वित्तंबातमी देणारा त्यांना एक ब्राम्हण भेटला होता, त्याची भेट घेऊन तो काय सांगतो तें ऐका ह्मणून त्यानें विनंती केली त्याचप्रमाणें काशी शहराच्या बाहेर थोड्या अंतरावर सिक्रोल येथें कांहीं पलटणें ठेवावीं, ह्मणून तेथील वरील अधिकाऱ्यांनींही त्यांना सांगितलें पण यापैकीं एकही गोष्ट करण्याचें मि. चेरी साहेबांनीं मनांत आणिलें नाहीं, इतकेंच

नव्हे, तर त्यांनीं या सर्व गोष्टीकडे कानाडोळा केला. मि. चेरी साहेब जेव्हां मि. डेव्हीस साहेबाची कोणतीही गोष्ट ऐकेनात, तिकडे दुर्लक्ष करूं लागले, तेव्हां मि. डेव्हीस यांचा निरुपाय होऊन त्यांनीं या सर्व गोष्टी कलकत्त्याच्या व्यापारी मंडळीच्या मुख्य अधिकाऱ्याच्या व त्यांच्या सभासदांच्या कानांवर घातल्या. मग काय विचारतां! तेथील अधिकारी मंडळींत एकदम मोठी गडबड उडून गेली. सरजॉनशोअर साहेबांच्या जागीं आलेले वेलस्ली साहेब, हे त्यांच्यासारखे शांत स्वभावाचे गृहस्थ नव्हते. त्यांनीं वजीरअल्लीला काशीहून उचलून कलकत्त्यास आपल्या प्रत्यक्ष नजरेखालीं ठेवण्याचें ठरवून, त्याप्रमाणें करण्यास एकदम मि. चेरी साहेबास सक्तीचा हुकूम पाठविला. मि. चेरी साहेबास त्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांचा असा सक्तीचा हुकूम येऊन धडकल्याबरोबर, ते तरी मग काय करणार! त्यांनीं लागलेंच वजीरअल्लीला त्यानें आपलें काशी येथील चंबू गबाळें आटोपून कलकत्त्यास जाण्याकरितां तयार असावें ह्मणून कळविलें. वजीरअल्ली, त्याच्या दृष्टीनें सरजॉनशोअर साहेबांनीं त्याला अयोध्येच्या गादीवरून पदच्युत करण्यांत केलेला जो मोठा अन्याय, त्याच्या संतापानें आधींच वेडा झालेला होता, त्यांत हा आणखी अपमानकारक हुकूम त्याला कळतांच, आपल्या मस्तकावर हा व्यापारी मंडळीच्या अधिकाऱ्याचा हुकूम नव्हे तर मोठा वज्रपातच झाला असें त्याला वाटलें. संतापाच्या वेडेपणांतली ती समजूत. ती योग्य व योक्त कोठून असणार! कोणत्या कां कारणानें होईना एकदां एखादा मनुष्य राज्यपदावर अधिष्ठित होण्याला अपात्र ठरून तो तेथून च्युत झाल्यावर मग त्याला काशीस रहावें लागलें काय, किंवा कलकत्त्यास रहावें लागलें काय अथवा मक्का, लंका व जावा अशा तिसऱ्या ठिकाणीं रहावें लागलें काय, सारखेंच! तसें वजीरअल्लीला काशी शहर काय अधिक होतें! गंगाकांठच जर त्याला पाहिजे होता, तर तो कलकत्त्यासही होताच. पण वेडाच्या भरांत त्याच्या डोक्यांत हें कांहींच आलें नाहीं. सर्प चावलेल्या मनुष्याला जशा विषाच्या एकावर एक लहरी येतात, तशा हा हुकूम ऐकून वजीरअल्लीला संतापाच्या लहरी येऊं लागल्या. त्या वेडाच्या भरांत मी कलकत्त्याला साफ जाणार नाहीं, तुम्ही काय वाटेल तें

करा, असें त्यानें बरेंच मि. चेरी साहेबाजवळ अकांडतांडव केलें. त्याच्या त्या अकांडतांडव करण्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं, असें त्याला कळल्यावर विषाची लहर गेल्यावर जसा मनुष्य मग कांहीं वेळानें शांत होतो, तशी ती रागाची लहर गिळून टाकून वजीरअल्ली शांत झाला आणि कलकत्त्याला जाण्याबद्दल आपली आतां खुषी आहे, असें त्यानें साहेबाला कळविलें. हें जें त्यानें मागून कबूल केलें, यांत मात्र थोडीशी शहाणपणाची गोष्ट केली. वजीरअल्ली कलकत्त्यास जाण्याला कबूल झाल्याबरोबर त्याच्या पाठवणीची लागलेंच तयारी होऊन ता० १६ माहे जानेवारी सन १७९९ हा दिवस त्याचें ठाणें तेथून हालण्याचा कायम झाला आणि त्याप्रमाणें आपली सर्व तयारी करून तयार असावें असें साहेबांनीं वजीरअल्लीला कळविलें. वजीरअल्लीही मग मोठ्या जारीनें आपल्या तयारीला लागला. पण तो कोणत्या तयारीला जारीनें लागला, हें मि. चेरी व मि. डेव्हीस यापैकीं एकालाही अखेरपर्यंत कळलें नाहीं. तो कलकत्त्याला जाण्याची तयारी करण्याला लागला नसून, आपला वेडेपणाचा हेतु सिद्धीस नेण्याच्या तयारीला लागला. मि. चेरी साहेबांनीं त्याची कलकत्त्याला जाण्याची तारीख १६ जानेवारी नेमली, तर तिच्या आधीं दोन दिवस ह्मणजे ता० १४ जानेवारी ही वजीरअल्लीनें आपल्या कामाची तारीख नेमून टाकिली आणि त्याप्रमाणें तो त्या दिवशीं आपल्या जय्यत तयारीनिशीं तयार झाला.

वजीरअल्ली आणि त्याची मंडळी यांनीं जो व्यूह रचला होता, त्याप्रमाणें सर्व गोष्टी जर घडून आल्या असत्या तर त्याला त्याच्या या साहसाच्या कृत्यांत खात्रीनें यश येण्याचा पुष्कळ संभव होता, असें कांहीं मंडळींचें मत आहे. पहिल्या प्रथम बंडाचा झेंडा उभारून काशी येथील एकंदर सर्व इंग्लिश लोकांची कत्तल करून टाकावयाची, कीं त्यांच्यापैकीं एकही इसम आसपास असलेल्या इंग्लिश व्यापारी मंडळीच्या फौजेला बातमी देण्यालासुद्धां जिवंत ठेवावयाचा नाहीं. नंतर काशी शहराचे सर्व दरवाजे बंद करून आंतील सर्व लोकांनीं बाहेरून येणाऱ्या फौजेशीं सामना करण्याकरितां शस्त्रांसहित सज्ज होऊन तयार असावयाचें. या कृत्यांत पूर्णपणें यश मिळालें कीं, उत्तर हिंदु-

स्थानांतील सर्व असंतुष्ट, सरदार, जमीदार वगैरे पुष्कळ लोक त्याच्या बंडांत सामील होण्याचें ठरलें होतें. परंतु वजीरअल्लीच्या दुर्दैवानें उत्तर हिंदुस्थानांतील व्यापारी लोकांची फौज टिपू सुलतानाला जिंकून दक्षिण दिग्विजय करण्याकरितां व तिकडील फौजेला मदत करण्याकरितां तेथून अद्याप हालली नव्हती. काशीच्या वायव्येस अनपशहार येथें जनरल सर जेम्स क्रेग यांच्या हाताखालीं एक ब्रिगेड होती. त्याचप्रमाणें काशीपासून पांच कोसांवर बितावर येथें मेजर जनरल अर्स्कीन साहेबाच्या हाताखालीं एक घोडेस्वारांची, एक पायदळाची अशीं दोन पलटणें तयार होतीं. पंजाबांत तळ देऊन बसलेला झेमानशहा हा तेथून काशीकडे येईपर्यंत आणि उत्तर हिंदुस्थानांतील सर्व फौज दक्षिणेकडे निघून जाईपर्यंत जर वजीरअल्लीनें आपला झेंडा उभारला असता, तर त्याचे वेडेपणाचे कां होईनात पण त्याचे हेतु सिद्धीस गेले असते असे शहाणे शहाणे मुत्सद्दीही अद्यापपर्यंत ह्मणतात. परंतु त्याला एकदम ता० १६ जानेवारी सन १७९९ रोजीं कलकत्त्यास पाठविण्याचें ठरल्यामुळें त्याला निरुपायानें त्याच्या सर्व व्यूहाचा स्फोट तो अपरिपक्वदशेंत असतांच, फोडावा लागला आणि त्यामुळें त्याला त्याच्या त्या साहसकर्मांत अपयश येऊन, त्याचें वजन अत्यंत कमी होऊन तो सर्व गोष्टीला अपात्र ठरला इतकेंच नव्हे तर, जगांत राहण्यालासुद्धां अपात्र ठरला. इतका त्याच्या संतापाच्या वेडेपणाचा परिणाम त्याला पुढें भोगावा लागला.

तारीख १४ माहे जानेवारी सन १७९९ रोजीं ह्मणजे त्याच्या काशी येथून निघण्याच्यापूर्वीं दोन दिवस त्यानें आपल्या कटांतील सर्व मंडळी आपल्या मधुदासबागेंत जमा व्हावी ह्मणून ठरविलें. हें सर्व काम मोठ्या गुप्त रीतीनें चाललें होतें. काशीस आल्यापासून वजीरअल्ली इंग्लिश व्यापारी मंडळीच्या कोणत्याही लोकांपासून अगदीं अलिप्त रहात असे; परंतु निरुपायानें त्याला काशीचा मुख्य अधिकारी जो चेरी साहेब याच्याशीं पुष्कळ दळणवळण त्याच्या इच्छेविरुद्ध ठेवावें लागत होतें आणि त्यामुळेंच त्यानें त्याच्याशीं तेवढें पुष्कळ वळण अगदीं घरोब्यासारखें ठेवलें होतें. इतकें जरी त्यानें मि. चेरी साहेबाशीं बाहेरून मोठें मोकळेपणाचें वर्तन ठेवलें होतें, तरी साद

तअल्लीला काशीहून कानपुरापर्यंत अगदीं गुप्तरीतीनें आणून पोंहचविण्याच्या कामांत याच साहेबाचें फार अंग होतें, ह्मणून त्याच्याबद्दल वजीरअल्लीच्या मनांत अत्यंत द्वेष होता. ता० १३ माहे जानेवारी रोजीं संध्याकाळीं "मी उद्यां सकाळीं आपल्याकडे भेटीकरितां व सकाळचा अल्पाहार करण्याकरितां येणार आहे," अशी वजीरअल्लीनें मि. चेरी साहेबास चिठ्ठी पाठवून ठेवली. ती साधी रोजच्याप्रमाणें असल्यामुळें मि. चेरी साहेब यांच्या मनांत तिच्या-संबंधानें संशय येण्याचें कांहीं कारण नव्हतें. त्याप्रमाणें त्याला वजीरअल्लीच्या या कृत्याबद्दल मुळींच संशय आला नाहीं. तो आपल्या ठिकाणीं स्वस्थ होता

ता० १४ माहे जानेवारी हा दिवस उगवला. पूर्व संकेताप्रमाणें वजीर-अल्लीच्या मधुदास बागेंत त्याचे सुमारें २०० हत्यारबंद मुसलमान अनुयायी मोठ्या पहांटे जमा झाले. त्यांच्या धर्माप्रमाणें वजीरअल्लीकरितां प्राण देण्याच्या त्यांनीं शपथा घेतल्या होत्या. नंतर सुमारें साडेआठ वाजण्याच्या सुमाराला वजीरअल्ली त्या सर्व लोकांसह त्याच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें मोठ्या थाटानें मि. चेरी साहेबाच्या बंगल्याकडे जाण्यास निघाला. रस्त्यांत मि. डेव्हीस आपल्या पत्नीसह हत्तीवरून त्यांच्या रोजच्या नियमाप्रमाणें सकाळचा फेरफटका करून परत येतांना भेटले. ज्याच्या शहाणपणानें, दूरदर्शीपणानें आणि सावधपणानें वजीरअल्लीचे पुढचे सर्व बेत निष्फळ झाले, त्या साहेब बहादुराचा आतांच समाचार घ्यावा किंवा कसें, याबद्दल त्याच्यामध्यें आणि त्याच्या अनुयायांमध्यें एक क्षणांत निश्चय होऊन, या साहेबाची वेळ अद्याप भरली नाहीं असें ठरवून, मि. डेव्हीस यास सलाम करून ती सर्व मंडळी पुढें चालली आणि खरोखरीच मि. डेव्हीस व त्याची पत्नी यांची वेळ भरली नव्हती; ह्मणूनच तीं उभयतां त्यांच्या हातातून सुटलीं. वजीरअल्ली आपल्या लोकांसह तिकडे निघून गेला आणि डेव्हीस साहेब आपल्या घरीं त्यावेळी सुरक्षित येऊन पोंहचले. परंतु मि. डेव्हीस साहेबाच्या घरीं सकाळचा अल्पाहार करण्याकरितां त्याच्यामागून पालखींत बसून जाणारा त्याचा तरूण मित्र मि. ग्रेहॅम याची मात्र शंभर वर्षे भरलीं होतीं. कांहींसें पुढें गेल्यावर मि. ग्रेहॅम त्याला भेटला. त्याला पाहिल्याबरोबर वजीरअल्लीच्या व त्याच्य

लोकांच्या मनांत काय आलें कोणास ठाऊक! त्यांनीं त्याला एकदम पालखींतून ओढून काढून त्याचे लागलेंच तेथच्या तेथेंच तुकडे तुकडे करून टाकिले. बिचारा ग्रेहॅम हा त्याच्या इंग्लिश व्यापारी मंडळीबद्दलच्या द्वेषाग्नीला पहिला बळी पडला. आणखी पुढें गेल्यावर हिल नांवाचा एक दुकानदार भेटला, त्याची त्यांनीं दुसरी आहुति दिली. जातां जातां रस्त्यांत सहज लीलेनें या दोन इंग्लिश गृहस्थांना कंठस्नान घालून वजीरअल्ली मि. चेरी साहेबाच्या बंगल्यावर जाऊन पोंहचला. आपल्या घरीं निमंत्रण देऊन चालून येणाऱ्या पाहुण्याचें आदरातिथ्य करण्याकरितां पदच्युत झालेल्या तरूण नबाब वजीरअल्ली आलेला पाहून मि. चेरी साहेब त्याला ओसरीपर्यंत सामोरे गेले आणि त्याचा हात धरून त्यांनीं त्याला जेथें अल्पाहाराची तयारी केली होती. त्या खोलींत नेऊन बसविलें. वजीरअल्लीच्या मागोमाग त्याचे चार अनुयायीही आंत बळेंच घुसले. त्यामध्यें वारीसअल्ली आणि इजातअल्ली हे दोन तरूण गृहस्थ मुख्य असून, ते सर्वजण ढाल, तरवार आणि तमंचे या शस्त्रांनीं अगदीं सज्ज होते. हे दोघेच मुख्यतः वजीरअल्लीला त्याच्या या कटांत सामील असून, वारंवार त्याला अशा कामांत उत्तेजन देऊन उत्तम सहाय्य करीत होते. वजीरअल्लीसह मि. चेरी हे अल्पाहाराच्या टेबलासभोंवतीं बसले. एका बाजूला वजीरअल्ली व त्याच्यासमोर मि. चेरी साहेब असे ते एकमेकासमोर बसले होते. नंतर मि. चेरी साहेबानें ताटांतून एक चहाचा पेला उचलून आपल्या पाहुण्याच्या पुढें केला. तो वजीरअल्लीनें रागानें बाजूला सारून मला तुह्मांला कांहीं महत्वाची गोष्ट सांगावयाची आहे असें ह्मणून त्यानें इंग्लिश व्यापारी मंडळीवर एकसारखा शिव्यांचा वर्षाव केला. नंतर आपला जीव घेण्याच्या कामांत सादतअल्लीला मदत करण्यांत तुम्ही सामील होता, असा मि. चेरी साहेबावर दोषारोप केला. 'मी कलकत्त्याला साफ जात नाहीं' असें वजीरअल्लीनें त्याला स्पष्ट सांगितलें. आपल्या घरीं आमंत्रण देऊन अल्पाहार करण्याकरितां आलेल्या वजीरअल्लीचें हें वेडेपणाचें व विचित्र वर्तन पाहून मि. चेरी हे आपल्या ठिकाणीं आश्चर्यानें स्तब्ध होऊन त्याच्याकडे नुसते पहातच राहिले. मि. चेरी भांबावून गेले आहेत असें पाहून व ती संधी साधून वजी-

रअल्ली लागलेंच आपल्या जागेवरून उठला आणि चेरी साहेबाच्या जवळ गेला. तो उठला तसे त्याच्याबरोबर आंत आलेले त्याचे दांडगे चार स्नेहीही उठले. ती त्यांची पूर्वी ठरलेली खूण होती. वजीरअल्लीनें डोळ्याचें पातें लवतें न लवतें तों लागलेंच मि. चेरी साहेबाच्या जवळ जाऊन त्याचा गळेबंद धरला. त्याचक्षणीं वारीसअल्लीनें चटकन उठून मि. चेरी साहेबाचे हात पाठीमागें जखडून टाकले. वजीरअल्लीनें आपली तरवार उपसून लागलेंच त्याच्यावर एक वार करून मि. चेरी साहेबाला जखमी केलें. मि. चेरी जरी जखमी झाला होता, तरी धडपड करून तो दुर्दैवी मनुष्य त्यांच्या हातांतून कसा तरी निसटून प्राण वांचविण्याकरितां बाहेर धांवत गेला. तो आयताच त्या बंगल्याला व बागेला वेढा दिलेल्या वजीरअल्लीच्या लोकांच्या हातीं सांपडला. त्यांनीं लागलेंच तेथल्या तेथेंच त्याचे राई एवढें तुकडे तुकडे करून टाकले. दोनशें मनुष्यांच्या तीक्ष्ण धारेच्या तरवारींच्या तडाक्यांतून तो जिवंत सुटणार कसा? वजीरअल्लीच्या द्वेषाग्नीला मि. चेरी साहेबाची ही आहुति होय. मि. चेरी साहेबाचा प्राण घेऊन ही मंडळी थांबली नाहीं. मि. चेरी साहेबाचा मि. इव्हॅन्स ह्मणून एक खासगी सेक्रेटरी होता. त्याला इजातअल्लीनें पकडून आपल्या कट्यारीनें जखमी केलें. तो जखमी झालेला पाहून इजातअल्ली राक्षसाचा त्याच्यावर असलेला हात जरा सैल पडला. त्याबरोबर एक झटका देऊन मि. इव्हॅन्स त्याच्या हातून निसटून बागेंतून व शेतांतून प्राणाच्या आशेनें एकसारखा पळत सुटला. पण वजीरअल्लीच्या लोकांच्या तडाक्यांतून जिवंत सुटावें इतका तो नशिबवान नव्हता. तो लागलेंच वेढा दिलेल्या लोकांच्या हातीं सांपडून मि. चेरी साहेबाप्रमाणें तेथेंच मारला गेला. हें कत्तलीचें काम येथेंच संपलें नाहीं. कपतान कॉनव्हे ह्मणून लष्करी अधिकारी मि. चेरी साहेबाच्या बंगल्यांत त्यांच्या घरीं रहात होता. तो घोड्यावर बसून सकाळची थंड हवा खाऊन नेहमींप्रमाणें परत बंगल्याकडे येत होता. बागेच्या दरवाजांतून तो आंत आला मात्र, इतक्यांत वजीरअल्लीच्या लोकांनीं त्याला त्या दरवाजांतच घोड्यावरून खालीं ओढून ठार केलें. याप्रमाणें मि. चेरी याच्या बंगल्यांतील मंडळीची कत्तल करून आणि या तीन साहेबांचीं

ती बर्ची भिंतीवर आपटली. इतक्यांत त्यानें बर्चीचें पातेंच हातानें बळकट धरलें. आपली बर्ची आतां निरुपयोगी झाली असें पाहून मि. डेव्हीसनें ती सोडून दिली. ती जिन्यावर जोरानें आपटल्यामुळें ती धरणाऱ्याच्या हाताला ही एक मोठा झटका बसला. तेवढी संधी मोठ्या चातुर्यानें साधून मि. डेव्हीसनें त्या शिपायाच्या हातांतील शस्त्र मोठ्या सफाईनें एका झटक्याबरोबर हिसकावून घेतलें. त्याबरोबर त्याचा हात कापला जाऊन तोही जखमी झाला. मग तर मि. डेव्हीसच्या हातांत दुसरें शस्त्र आल्यामुळें त्याला दुप्पट हिंमत आली. त्याच्या हातांत शस्त्र गेलेले पाहून जिन्यावरची मंडळीही पुढें वर जाण्याचा प्रयत्न न करितां खालीं उतरून गेली आणि तिनें मग खालीं असलेल्या निर्जीव व सजीव वस्तूंवर आपला राग काढण्याला आणि त्यांचा नाश करून टाकण्याला प्रारंभ केला. बंगल्यांतील जें कांहीं मौल्यवान सामान त्यांच्या हातीं लागलें तें सर्व त्यांनीं मोडून तोडून टाकलें. मोठमोठे आरसे होते ते फोडून टाकले. त्यांनीं तेथील एकही वस्तु धड अशी ठेविली नाहीं. मि. डेव्हीस साहेबाचे तीन नोकर सामानाची मोडतोड न करण्याकरितां त्यांना सांगण्यास गेले, तों त्यांनीं त्यांनाही तेथेंच ठार करून टाकलें. नंतर त्या बंडखोरांची दृष्टी मि. डेव्हीसच्या घोड्यांच्या तबेल्याकडे वळली. तेथें वॉरन हेस्टींगनें मि. डेव्हीसला दिलेल्या घोड्यांच्या दोन तीन जोड्या होत्या. त्यापैकीं चांगले जे घोडे होते, ते त्यांनीं आपणाकरितां घेऊन, जे म्हातारे होते त्यांना सोडून न देतां तेथेंच गोळ्या घालून ठार करून टाकलें. कांहीं मंडळींचें हें इकडे राक्षसी कृत्य चाललें असतां, दुसरी मंडळी उगीच बसली नव्हती. त्यांनीं मि. डेव्हीस आणि त्याची बायको, मुलें वरच्या मजल्यावर जेथें आपला जीव वचावण्याकरितां धवा धरून राहिली होतीं, तेथें खालून त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव केला. मध्यभागीं खालीं बसून राहिल्यामुळें त्यापैकीं कोणीं जखमी झालें नाहीं. पण त्यापैकीं एका दाईनें डोकें जरा वर केल्याबरोबर तिला एक गोळी लागून ती तेथेंच पडली.

वेढा चालू असतांना चहूंकडे सर्व शहरभर एकच दंगल उडून गेला होता. अशा बंडाच्या व धामधुमीच्यावेळीं जी अव्यवस्था, दंगल, धामधूम, तोडफोड

लूट वगैरे कृत्यें होतात, त्यांना सीमाच नसते. वजीरअलीच्या लोकांनीं अशी बंडाळी सुरू केल्याबरोबर काशी येथील पुष्कळ युरोपियन मंडळी लागलेंच बितावरच्या छावणीकडे पळून गेली. त्यांची एक मोठी टोळी जीव बचावण्याकरितां बाहेरच्या धान्याच्या मोठमोठ्या वाढलेल्या शेतांत लपून बसली. ही सर्व मंडळी जर त्या बंडखोर लोकांच्या दृष्टीस पडती, तर शेतांतील धान्याबरोबर किंवा कणसांबरोबर त्यांच्याही शिरकमळांची कापणी होण्याला वेळ लागला नसता. त्यांचें नशीव त्यांना त्यावेळीं अनुकूळ होतें ह्मणून ते सर्व वांचले. काशी येथून युरोपियन मंडळीनीं वजीरअलीच्या व त्याच्या लोकांच्या भयानें आधींचि पळ काढला होता. त्यापैकीं मि. क्लीव्ह साहेबानें बितावर येथें सर्वांच्या पुढें पळत जाऊन आधीं मे. जनरल इस्कोइन साहेबाला बंडाची बातमी दिली. त्याबरोबर मि. इस्कोइन साहेब आपल्या सर्व फौजेसह त्याचक्षणीं काशीला येण्याला मोठ्या त्वरेनें निघाला. त्याला बितावर येथून मि. डेव्हीसच्या बंगल्यापर्यंत येण्याला सुमारें एक तास लागला. सुमारें एक तास झाल्यावर जेव्हां मि. डेव्हीसच्या बंगल्यांतील खालच्या मजल्यावरच्या बंडखोर लोकांचा गोंगाट व नासधूस जराशी कमी झाली, तेव्हां वरती धब्रून राहिलेल्या मंडळीला आपणाला मदत आली असावी, असें वाटलें. इतक्यांत मि. डेव्हीसचा एक म्हातारा नोकर हातांत चहाचें चुकून धड राहिलेलें भांडें घेऊन जेव्हां ती खूण ह्मणून त्यानें वरच्या मंडळीला दाखविली तेव्हां शत्रू परतले असें समजून वरच्या मंडळीच्या थोडासा जिवांत जीव आला. नंतर पंधरा हत्यारबंद पोलीस लोक मि. डेव्हीसच्या मदतीला आले. मग त्यांच्या मदतीनें आपण शत्रूशीं आणखी कांहीं वेळ तरी टिकाव धरूं अशी त्याला हिंमत आली. अकरा वाजण्याच्या सुमारास इंग्लिश व्यापारी मंडळीच्या घोडेस्वारांचीं शिरोभूषणें जेव्हां थोड्या अंतरावरून चमकूं लागलीं, तेव्हां आतां मात्र आपणाला सैन्याची कुमक आली व आपले प्राण खास वांचले, असें मि. डेव्हीसला व त्याच्या कुटुंबांतील मंडळींना वाटलें. इतक्यांत घोडेस्वारांचा रिसाला येऊन पोंहचला आणि तो डेव्हीस साहेबाच्या बंगल्यासमोर शहरांतून येणाऱ्या शेंकडों लोकाशीं सामना देण्याकरितां मोठ्या

धैर्यानें सज्ज होऊन उभा राहिला. शहरांतून शेंकडों बंडखोर या फौजेवर चालून येऊं लागले. येतांना जेव्हां त्यांनीं बंदुकीचे वार काढले. तेव्हांच त्यांचा हेतु काय होता हें या फौजेला कळून चुकलें. जर घोडेस्वार आंबराईत व बागेंत अडचणीच्या जागेंत सांपडले असते, तर त्यांना मोठें कठिण गेलें असतें; लागलेंच त्यांना दुसरीकडून पायदळ पलटणीची मदत येऊन पोंहचल्यामुळें आणि तिनें बराच नेट धरल्यामुळें घोडेस्वारांवरचें एक मोठें संकट टळलें. पण या कृत्यांत पायदळ पलटणींतील बरेचसे लोक शहरांतील आडगल्लींतून निघतांना, छपरावरून व गच्चीवरून बंडखोरांनीं सोडलेल्या गोळ्यांना बळी पडले. अशा स्थितींत सरतेशेवटीं ती पायदळ पलटण मि. डेव्हीस साहेबाच्या बंगल्याजवळ येऊन पोंहचली. त्या दोनी पलटणींवर जवळच्या आंबराईच्या दाट झाडींतून वजीरअल्लीनें एकसारखा गोळीबार चालविला होता. त्या टोळीचें आधिपत्य खुद्द वजीरअल्लीकडे होतें. वजीरअल्लीच्या या छोट्या फौजेवर इंग्लिश व्यापारी फौजेनें एक दोन तोफेचे गोळे टाकल्यावर त्यांना त्या आंबराईतून निघून जाणें भाग पडलें. वजीरअल्ली त्या झाडींतून आपल्या लोकांसह जो निघाला, तो मधुदास बागेंत आला. तेथें लागलेंच त्यांच्या पाठोपाठ इंग्लिश व्यापारी मंडळीची फौज येऊन धडकली. वजीरअल्ली मधुदास बागेंत येऊन वरच्या मजल्यावर चढून उभा राहिला. त्याच ठिकाणीं इंग्लिश फौजेनें एक तोफेचा गोळा नेमका टाकल्याबरोबर 'आपला आतां या फौजेपुढें निभाव लागलें कठिण, आपला दिवस फिरला,' असें वजीरअल्लीला वाटून तो खालीं उतरला. नंतर वारसअल्ली आणि कांहीं थोडेसे लोक बरोबर घेऊन व घोड्यावर स्वार होऊन मागल्या दारानें वजीरअल्ली डोंगरांत पळून गेला. कांहीं वेळ गेल्यानंतर व्यापारी मंडळीच्या मधुदास बंगल्याला वेढा दिलेल्या फौजेनें तोफेच्या गोळ्यानें त्याचा दरवाजा उडवून दिला आणि वजीरअल्लीला हस्तगत करण्याकरितां ती फौज आंत शिरली. पण तेथें वजीर कोठें होता! तो त्या सर्वांची दृष्टी चुकवून त्याच्या आधींच तेथून आपल्या कांहीं जिवलग मित्रांसह नाहींसा झाला होता. त्यामुळें त्या विजयी फौजेच्या हातीं त्यावेळीं वजीरअल्ली न लागतां, तो रिकामा मधुदास बंगला मात्र लागला.

वजीरअल्ली मधुदास बंगल्यांतून आपल्या कांहीं अनुयायांसह जो निघाला तो मध्यें कोठें न थांबतां, एकदम नेपाळ तेराईच्या डोंगरांत गेला. तेथें त्यानें थोडक्याच दिवसांत जवळ जवळ चार हजार लोक जमविले. ही बातमी व्यापारी मंडळीलाही लागलेंच कळली. त्यांनीं मग आपली दुसरीं महत्वाची कामें कांहीं दिवस बाजूला ठेवून वजीरअल्लीला पकडून आणण्याकरित आणि त्याच्या बंडाचा बीमोड करण्याकरितां तिकडे आधीं आपली फौज रवाना केली. ज्या वजीरअल्लीनें एवढा मोठा प्रचंड व्यूह रचला होता, तो कांहीं अगदींच भित्रा नव्हता. कदाचित भित्रा असला तरी त्याचें डोकें वेडानें, द्वेषानें व अन्यायाच्या संतापानें भरून गेलें असल्यानें, त्यांनीं त्याच्या त्या भित्रेपणाला तेथून केव्हांच हुसकावून लाविलें होतें. व्यापारी मंडळीची फौज पाठलाग करीत येऊन थडकल्याबरोबर त्यानें आपल्या लहानशा फौजेसह त्या फौजेशीं दोन हात करण्याची तयारी करून त्याप्रमाणें कांहीं दिवस पर्यंत त्या रानांत त्या फौजेला घोळविलें. शेवटीं नशिबानें त्याला तेथेंही अपयश दिलें. त्यामुळें त्याच्या सर्व फौजेचा पराभव होऊन त्याला मग तेथून एकट्याचाच आपला प्राण वांचविण्याकरितां दुसरीकडे निरुपायानें पलायन करावें लागलें. याहीवेळेस वजीरअल्ली त्यांच्या हातीं लागला नाहीं व त्याची बाजारबुणगी फौजही जाग्यावर राहिली नाहीं असें पाहून, व्यापारी मंडळीची फौज गेली होती तशीच परत स्वस्थळीं आली. आतां वजीरअल्ली देहासकट हातीं लागत नाहीं तर नाहीं, पण त्याचें नुसतें निर्जीव डोकें तरी हातीं लागावें, म्हणून व्यापारी मंडळीनीं त्याची वीस हजार रुपये किंमत ठरवून तें मिळविण्याबद्दल मग चहूंकडे जाहिरनामे लावून जारीनें खटपट सुरू केली.

वजीरअल्ली समरांगण सोडून जो निघाला तो राजपुतान्यांत जयपुरास येऊन तेथील महाराजांच्या पाठीमागें त्यांचा आश्रय करून राहिला. त्याच्या शिराबद्दल व्यापारी मंडळीचें लागलेलें बक्षीस जयपूरच्या महाराजाला माहित होतें. व्यापारी मंडळीच्या अधिकाऱ्यांनीं त्यांना ही बातमी कळतांच लागलीच जयपूरच्या महाराजाकडे त्याबद्दल मागणी केली. राजपुतान्यांत व इतर ठिकाणीं त्या वेळपर्यंत त्यांचे कसेही शत्रु असले व ते कोणाकडूनही आले असले

तरी, ते दोनी हातांनीं झेलून व वजनदार ह्मणून हातांतच न ठेवतां, वाटेल तें ओझें सहन करण्याची शक्ति परमेश्वरानें ज्या शिराच्या ठिकाणीं ठेवली आहे, तेथें नेऊन ठेवण्याची वेळ राजपुतान्यांत आली नसल्यानें व तेथील महाराजाला त्या बक्षिसाच्या रक्कमेनें त्याच्या खजिन्यांत भर टाकण्याची अवश्यकता त्यावेळीं नसल्यानें, त्यांच्या त्या वजनदार मागणीचें महत्व तेथें तितकें वाटलें नाहीं. मागणी आल्यावर ती त्यानें आली तशीच हलक्या हातानें, पण मान तुकावून व तिला थोडासा मान दिल्यासारखें करून कांहीं दिवस दरबार शिरस्त्याप्रमाणें जरा बाजूला ठेवली. एकदां ज्याला पाठीशीं घातलें त्याच्याबद्दल आपल्याला जिवितप्रिय असलेलें प्रत्यक्ष पोटचें पोर द्यावें व आपले प्राणही द्यावे, पण त्याला देऊं नये अशी धीर वीर क्षत्रिय पुरुषाची मुख्य तत्वें आहेत. त्या तत्वांचा राजपुतान्यांतून व त्यावेळच्या जयपूरच्या महाराजाच्या मनांतून लोप झाला नसल्यामुळें जयपूरच्या महाराजानें इंग्लिश व्यापारी मंडळीची वजीरअल्लीला स्वाधीन करण्याबद्दलची मागणी आल्याबरोबर त्या भीताला अभय दिलेल्या बिचाऱ्या वजीरअल्लीला त्यानें ताबडतोब त्यांच्या स्वाधीन केलें नाहीं. त्यानें कांहीं दिवस त्याला आपल्याजवळ ठेवून शिष्टाचाराप्रमाणें त्याचा योग्य तो पाहुणचारही केला. पुनः व्यापारी मंडळींनीं त्याच्याबद्दल मागणी केली, तेव्हां जयपूरच्या महाराजानें 'आम्ही वजीरअल्लीचा शिरच्छेद करणार नाहीं व त्याच्या पायांत शृंखळाबंधन करणार नाहीं.' असें त्यांच्याकडून जेव्हां स्पष्टपणें कबूल करून घेतलें, तेव्हां व्यासानीं जसें अर्जुनाकडून अश्वत्थाम्याचा धृष्टद्युम्नाचा व त्याच्या मुलांचा केलेल्या वधाबद्दल शिरच्छेद न करण्याचें वचन घेऊन मग त्याला श्रीकृष्णार्जुनाच्या स्वाधीन केलें, तसें मग जयपूरच्या महाराजानें वजीरअल्लीला त्यांच्या स्वाधीन केलें. त्यावेळीं जयपूरच्या महाराजाला वचन देऊन तें न मोडण्याइतकें त्याचें व त्याच्या वजनाचें व्यापारी मंडळीजवळ वजन होतें. त्यांनींही थोरपणाला व सत्याला स्मरून जयपूरच्या महाराजाला वजीरअल्लीच्या संबंधांत दिलेलें वचन मोडलें नाहीं. फक्त त्यांनीं त्याला आपल्या स्वाधीन करून घेतलें. त्याला कलकत्त्याला नेऊन ठेवण्याबद्दल व्यापारी मंडळीचा एक वर्षापूर्वींच

तेव्हां त्या फौजेची निराशा काय विचारावयाची आहे! विजयानंदानें त्या सर्वांच्या चेहऱ्यांवर जी टवटवी यावयाची, तिच्याऐवजीं निराशेची व औदासिन्याची किंचित छटा मात्र आली. इतक्यांत सूर्य अस्तास जाऊन खरोखरीच जिकडे तिकडे काळाकुट्ट अंधार पडला. सूर्यास्त होण्यापूर्वीं या फौजेनें इकडे जय मिळवून वजीरअलीचा नुसता रिकामा कां होईना पण तो मधुदास बंगला त्यावेळीं हस्तगत करून घेतल्यामुळें मोठेंच काम झालें. रात्रीपर्यंत जर हें काम झालें नसतें, तर त्या रात्रीं सर्व काशी शहरांत बंडाळी माजून बंडखोर लोकांनीं अगदीं कहर करून सोडला असता. त्यांनीं तेथील एकदेखील युरोपियन त्या रागाच्या त्वेषांत जिवंत ठेवला नसता. सर्वांची एकसारखी कत्तल करून गंगेचें शुद्ध आणि शुभ्र उदक ह्मणून तांबडें लाल करून टाकलें असतें. तसाच त्यांचा पूर्वींपासून कट झालेला होता. ही जी त्यावेळीं काशी येथील सर्व युरोपियन लोकांची कत्तल झाली नाहीं, याचें श्रेय मि. डेव्हीस यानें तास दीड तास मोठ्या शौर्यानें जो बंडखोराशीं सामना केला आणि त्या सर्वांचें लक्ष आपल्याकडे आणि आपल्या कुटुंबाच्याकडे गुंतवून टाकलें होतें, त्याकडे आहे. मि. डेव्हीस साहेबाच्या बंगल्यांतील काम जर मि. चेरी साहेबाच्या बंगल्यांतील कामासारखें तावडतोब झालें असतें, तर बंडवाल्यांना आपला मोर्चा दुसऱ्या युरोपियन लोकांवर फिरविण्यास वेळ सांपडला असता. पण ते मि. डेव्हीस याच्याशीं गुंतल्यामुळें बाकीच्या युरोपियन मंडळींना पलायन करून प्राण वांचविण्याला तेवढीच संधी सांपडली. तसें करण्याखेरीज त्यांना दुसरा मार्गच राहिला नव्हता. नाहींतर त्या सर्वांची वजीरअलीच्या व त्याच्या लोकांच्या, थोडीशी घृताहुति मिळाल्याबरोबर एकदम भडकून उठलेल्या अग्निप्रमाणें द्वेषाग्नीला पूर्णाहुति मिळाली असती. मधुदास बंगला हातीं आल्यावर मग ती फौज शहराकडे वळली. त्या रणयज्ञाचा मुख्य अध्वर्यु जो वजीरअली तो पळाल्याचें आणि व्यापारी मंडळींची फौज विजयी झाल्याचें शहरांतील त्याच्या अनुयायांना कळल्याबरोबर त्या मंडळींचा द्वेषाग्नि मग जेथल्या तेथेंच थंड होऊन शहरांत ही लवकरच जिकडे तिकडे सामसूम झाली.

ठराव होऊन चुकला होता. त्याप्रमाणें वजीरअल्लीला घेऊन कलकत्त्याला जाण्याकरितां जयपुराहून सर्व मंडळी निघाली. परभारें जें कलकत्त्याला जायचें तें मध्यें काशी येथें मुक्काम करून मग पुढें जावें असें ठरून ती सर्व मंडळी वजीरअल्लीसह ता० १३ माहे जानेवारी सन १८०० च्या सुमारास काशीस येऊन पोंहचली. ता० १४ माहे जानेवारी सन १७९९ च्या ज्या दिवशीं वजीरअल्लीनें पांच सहा युरोपियन लोकांच्या रक्तानें आपली तरवार व आपलें पांढरें बंडाचें निशाण लाल करून उभारिलें होतें, त्याच ता० १४ माहे जानेवारी सन १८०० च्याच वार्षिक दिवशीं ज्या काशी शहरांत वजीरअल्ली मोठ्या थाटानें व लवाजम्यानें आपले दोन तीनशें हत्यारबंद स्वार व शिबंदी बरोबर घेऊन हिंडत असे, त्याच काशी शहरांत त्याच दिवशीं ज्या ठिकाणीं त्यानें युरोपियन लोकांची कत्तल संतापाच्या वेडांत केली, त्याच ठिकाणीं तशाच थाटानें व्यापारी मंडळीच्या फौजेसह, त्या फौजेवरील अधिकाऱ्यांनीं त्याला फिरवून आणिलें. त्याच्या इ. स. १७९९ च्या व इ. स. १८०० च्या या दोनी वेळच्या थाटमाटांत फारसें अंतर नव्हतें. स. १७९९ सालीं अयोध्येचा पदच्युत केलेला नवाब ह्मणून नुसता ‘राजकैदी’ अशी त्याची स्वारी निघत असे. स. १८०० सालीं तो खुनी व बंडखोर ह्मणून खरा बंदीवान अशी त्याची स्वारी, अथवा ‘वरात’ किंवा धिंड ह्मणून मिरवणूक निघाली. त्यावेळीं तो नांवाचा तरी नबाब होता. आतां तो दुर्बल, हतभाग्य असा व्यापारी मंडळीच्या फौजेंत एका साधारण कैद्याप्रमाणें कैदी होता. ता. १४ माहे जानेवारी सन १८०० या ‘काशीच्या कत्तलीच्या’ वार्षिक दिवशीं वजीरअल्लीला फौजेच्या अधिकाऱ्यांनीं मोठ्या बंदोबस्तानें गंगेचें, काशी शहराचें, त्याच्या मधुदास बंगल्याचें व स्नेहासोबत्यांचें लांबून दर्शन करवून व त्याला त्याच्या वेडेपणाच्या कृत्याचें तीं तीं स्थानें दाखवून स्मरण देऊन लागलेंच कलकत्त्यास नेऊन पोंहचविलें. तेथें गेल्यावर जेथें तोफेच्या गोळ्यांचाही फारसा इलाज चालणार नाहीं, अशा उत्तम बंदोबस्ताच्या फोर्ट वुइलियम किल्ल्यांत त्याची कायमची त्यांनीं राहण्याची सोय केली. त्याचें किल्ल्यांतील राहण्याचें ठिकाण अशा बंदोबस्तानें होतें कीं, त्याला एक

प्रकारचा हिंस्र पशुचा लोखंडी पिंजराच ह्मणतां येईल. वाघ किंवा सिंह यासारख्या क्रूर व हिंस्र पशूला ज्या लोखंडी पिंजऱ्यांत कोंडून ठेविलें असतां तेथून जसें त्याला स्वतः जिवंतपणीं किंवा दुसऱ्या कोणी काढल्याशिवाय बाहेर निघतां येत नाहीं, तसें तें वजीरअल्लीचें ठिकाण मोठें बंदोबस्ताचें होतें. तेथें गेल्यावर बलहीन सिंहाप्रमाणें, त्याच्यापुढें त्याचे मालक वेळेला जो बरा वाईट तुकडा टाकतील तो खाऊन तो आपल्या आयुष्याचे दिवस पंजरस्थ राहून घालवूं लागला. तेथें बरींचशीं वर्षे घालविल्यावर आतां या निर्जीव प्राण्याचें लोकांतराला जाण्यापूर्वीं थोडेसें तरी स्थलांतर करावें, अशी व्यापारी मंडळीच्या अधिकाऱ्यांना मोठी दया येऊन त्यांनीं त्याचें प्रस्थान उत्तर दिशेकडून दक्षिण दिशेकडे जाण्याच्या त्याच्या प्रवासाच्या अर्ध्या रस्त्यावर ह्मणजे कलकत्त्याहून मद्रास इलाख्यांतील 'वेलोर' येथें नेऊन ठेवलें. तेथें म्हैसूरच्या वाघाचीं, टिपू सुलतानाचीं कांहीं कच्चीं बच्चीं, त्याची जातभाई मंडळी होती, त्यांच्या सहवासांत आणखी कांहीं वर्षे घालवून त्या अभागी वजीरअल्लीनें एकदाचें लोकांतराला प्रयाण केलें.

वजीरअल्लीला कैद करून कलकत्त्याला नेल्यावर, त्याच्या त्या भयंकर कटांत जी जी मंडळी सामील होती, त्यांचा त्यांचा शोध करण्याचें काम मग जारीनें सुरू झालें. या बिकट कटाचे धागे किती लांबपर्यंत पसरले होते, त्याच्या क्षेत्र मर्यादेंत कोणचे कोणचे प्रांत व तेथील कोण कोण बडी बडी मंडळी येत होती याचा त्याच्या प्रत्येक धाग्या धाग्याचा छडा लावून बारकाईनें शोध करण्याचें मोठें अवघड व नाजूक काम शेवटी मि. डेव्हीस जो या कत्तलींतून मोठ्या शर्तीनें वांचला होता आणि ज्यानें एक तास दीड तास वजीरअलीच्या लोकांशीं झुंजण्यांत घालवून, त्यांना तेथें गुंतवून बाकीच्या काशी येथील दुसऱ्या युरोपियन लोकांची कत्तल वांचविली होती, त्याच्यावर येऊन पडलें. त्यानें जेव्हां या बंडाची सर्व बारीक रीतीनें चौकशी केली, तेव्हां त्याच्यासंबंधाचा पुष्कळ विलक्षण प्रकार बाहेर आला असें ह्मणतात. वजीरअलीच्या अनुयायांपैकीं मुख्य जे भवानीशंकर आणि जगतसिंग अनुयायी होते, ते लवकरच पकडले गेले. नंतर त्यांची निराळ्या न्यायासनासमोर चौकशी

होऊन, त्या मोठ्या कटांत सामील असल्याबद्दल जगतसिंगाला देहान्त शासनाची व भवानीशंकराला काळ्या पाण्याची अशा शिक्षा मिळाल्या. भवानीशंकरानें कलकत्त्याला जात असतांना, जातिबहिष्काराच्या भयानें रस्त्यांतच विष खाऊन आत्महत्या केली. तिसरा मुख्य पुढारी शिवनाथ हा आपल्या शहरांतील घरांत पांच लठ्ठ बाणकस बाळगणाऱ्या चाकरांसह बंदोबस्तानें लपून बसला त्याच्या घराला जेव्हां फौजेनें गराडा दिला, तेव्हां त्या बाहेरच्या पुष्कळ लोकांशीं शिवनाथानें कित्येक तास मोठ्या शौर्यानें टिकाव धरला. शेवटीं निरुपाय झाल्यामुळें शिवनाथ व त्याचे पांच चाकर हल्केंच बाहेर पडले. त्यावेळेस त्यांची व बाहेरच्या लोकांची बरीच चकमक उडाली. त्या चकमकींतच सर्वांची कत्तल झाली हें खरें, पण त्या पांचजणांनींही आपल्या पराक्रमानें मरतां मरतां त्या लोकांपैकीं पंचवीसजणांना तेथेंच लोळवून त्यांच्या स्त्रिया विधवा करून टाकल्या. हे व याशिवाय दुसरे जे जे बंडांतलि मुख्य मुख्य पुढारी फरारी झाले होते. त्यांना त्यांना त्यांच्या गुप्त विवरांतून शोधून काढण्याचें काम पुढचे सुप्रसिद्ध सर इ. मौंट स्टुअर्ट एलफिन्स्टन साहेब यांनीं केलें. अशा रीतीनें या निमुकल्या बंडाचा व्यापारी मंडळीच्या धूर्त अधिकाऱ्यांनीं व फौजेनें थोडक्याच वेळांत बींमोड करून टाकला.

बंडखोरांना व त्यांच्या साथीदारांना त्यांच्या त्यांच्या कृत्यांबद्दल वर सांगितल्याप्रमाणें योग्य तीं बक्षिसें देण्याचें काम संपल्यानंतर मग ज्यानें खरी बहादुरी करून शेंकडों लोकांशीं एकट्यानें सामना देऊन व्यापारी मंडळीचें नांव राखलें. व त्यांच्या जातभाईपैकीं कित्येकांचें जीव वांचविलें त्या मि. डेव्हीस साहेबाला वगैरे बक्षिस देण्याच्या कामाला आरंभ झाला. कलकत्त्याचे मुख्य अधिकारी जे वेल्स्ली साहेब ते त्यावेळीं लढाईवर होते. तेव्हां त्यांच्या पश्चात् तेथील अधिकारी मंडळींच्या सभेकडून एकमतानें मि. डेव्हीस साहेब यास त्यांच्या शौर्याबद्दल नुसतें कोरडें शाबासकीचें व आभारप्रदर्शित केलेलें एक पत्र आलें. तें पत्र पाहून मि. डेव्हीस आपल्या मनांत अगदीं गारीगार होऊन गेले. तसेंच वेलस्ली साहेबांनींही स्वदस्तुरचें मि. डेव्हीसला त्यांच्या स्तुतीनें ओतप्रोत भरलेलें एक पत्र पाठवून दिलें. मात्र

वेलस्ली साहेब व मि. डेव्हीस साहेब आजन्म असे जानी दोस्त बनले. यापेक्षां मि. डेव्हीस साहेबाला आणखी काय द्यायला पाहिजे होतें व त्यानें तरी आणखी जास्त कशाची अपेक्षा करावयाची होती! काशी येथील चौकशीचें काम आटोपल्यावर मि. डेव्हीस यांची कलकत्त्यास नवीन होणाऱ्या मुलकी खात्यांतील मदतनिसाच्या जागेवर नेमणूक झाली. तेथें कांहीं वर्षें काम करून मि. डेव्हीस मग स्वदेशाला निघून गेले. तेथें गेल्यावर मि. डेव्हीस हा पुष्कळ वर्षें ईस्ट इंडिया कंपनीचा अध्यक्ष होता. पुढें त्यानें पार्लमेन्टांतही पुष्कळ वर्षें हिंदुस्थानासंबंधाचीं मोठमोठीं महत्वाचीं व जबाबदारीचीं कामें करून नांव मिळविलें. त्या जबाबदारीच्या कामामुळें मि. डेव्हीस याला पुष्कळ त्रास व त्याचें आयुष्य क्षीण होऊन तो इ. स. १८१९ त कायडन येथें मृत्यु पावला. त्याच्याबरोबरच काशी येथील बंडाची व तेथील कत्तलीची प्रत्यक्ष पाहिलेली आणि स्वतःवर बेतलेल्या प्रसंगाची हकिकत सांगणारा मनुष्य नाहींसा झाला.

## उपसंहार.

स्वार्थापासून कोणी सुटला आहे अशांतला प्रकार नाहीं. मग तो वजीरअल्लीसारखा नबाब असो किंवा साहसी व धूर्त इंग्लिश व्यापाऱ्यांचें मंडळ, अथवा त्यांतील असंख्य व्यक्ति असोत किंवा एखादा गरिब स्थितींतला काबाडकष्ट करणारा मजुर असो, राजापासून तों रंकापर्यंत सर्वांना या स्वार्थानें स्थिरचर व्यापून पुनः दशांगुलें उरणाऱ्या परमेश्वराप्रमाणें व्यापून टाकलें आहे. मात्र त्याचीही मर्यादा आंखलेली आहे. तिच्या बाहेर कोणीही व्यक्ति, अथवा अनेक व्यक्तींचा समुदाय गेला कीं, त्याला मर्यादेचें उल्लंघन केल्याबद्दलची ज्याप्रमाणें कायद्यांत सांगितलेली शिक्षा होते, त्याप्रमाणें याच्याही मर्यादेचें उल्लंघन केल्याबद्दल थोडी फार शिक्षा झाल्याशिवाय रहात नाहीं. मग ती कोणत्याही प्रकारची असो. ती अमुक एक प्रकारचीच असते असें नाहीं. असफउद्दवला मेल्यानंतर सादतअल्ली आणि वजीरअल्ली या दोन अयोध्येच्या गादीच्या वारसदारांचा वारसपणा ठरविण्याचें काम जेव्हां इंग्लिश व्यापारी मंडळीकडे आलें, तेव्हां वजीरअल्लीला गादीवर न बसवितां जर त्यांनीं सादतअल्लीलाच प्रथम गादीवर बसविलें असतें तर वजीरअल्लीला इतकें वाईट वाटलें

नसतें व त्याच्या हातून असलें भयंकर कृत्य झालें नसतें. त्याला प्रथम गादीवर बसवून मग कांहीं विशेष कारण नसतांना, केवळ द्रव्याच्या, प्रदेशाच्या व संपत्तिच्या प्रबलेच्छेनें त्याला एक वर्षाच्या आंत व्यापारी मंडळींनीं पदच्युत करून सादतअल्लीला त्याच्या पदावर बसविलें. त्यामुळें त्याचें डोकें संतापानें भडकून जाऊन. त्यानें तो संताप बिचाऱ्या दुसऱ्या मंडळींवर काढला. अपराध एकाचा आणि शिक्षा भलत्याला अशांतला हा प्रकार झाला. इंग्लिश व्यापारी मंडळींच्या कांहीं जातभाईंचीही विनाकारण कत्तल झाली, हा स्वार्थाच्या मर्यादेचें उल्लंघन केल्याचा कांहींसा दुर्धर परिणाम त्या मंडळीना भोगावा लागला. त्याचप्रमाणें पदच्युत झाल्यावर दैवावर हवाला ठेऊन स्वस्थ नेमणूक खात काशीस बसावें तें न केल्यामुळें आणि अंगांत शक्ति नसतां व परिस्थिति अनुकूल नसतां वेडेपणानें वजीरअलीनें भलतीच खटपट केली त्यामुळें त्याला कैदेंत सडून मरावें लागलें. पण दोघांच्या या कृत्यापासून आपणाला घेण्यासारखें पुष्कळ आहे. साहसी इंग्लिश व्यापारी मंडळींच्या लहान अधिकाऱ्यांपासून तों मोठ्या अधिकाऱ्यापर्यंत एक जुटीनें, एकमतानें, सर्व लक्ष एकाच साध्य गोष्टीकडे ठेवून काम करण्याची शैली खरोखरीच प्रशंसनीय होय. हा गुण त्यांच्या प्रत्येक व्यक्तिपासून घेण्यासारखा आहे. त्यांच्या साध्य हेतूच्या आड जे जे अडथळे येतील ते ते नाहींसे करण्यांत दया, माया. स्नेह, श्रम, द्रव्य वगैरेच्या व्ययाकडे मग मुळींच न पाहतां प्रत्येक व्यक्ति आपलें सर्वस्व खर्च करते. असा प्रत्येकाच्या मनांत एकच विशिष्ट हेतु साधून घेण्याचें असल्यामुळें खरोखरीच प्रथम तागडी तराजू धरण्याचें हलकें कामापासून राज्याक्रमण करण्यासारखी शक्ति संघानें उत्पन्न करून केवढी क्रांति करतां येते हें शिकण्यासारखें आहे. एवढें आपण व्यापारी मंडळींच्या प्रत्येक व्यक्तिच्या उदाहरणानें शिकून व चांगल्या साध्य हेतूकडे निःस्वार्थ दृष्टीनें लक्ष ठेवून कोणताही लहान मोठा उद्योग एकजुटीनें करण्यास शिकलों तर पुष्कळ कार्य होईल; पण तो सुदिन उगवेल तेव्हां खरा.

समाप्त